सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. १२ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ७१ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्रित लढवणार - मुख्यमंत्री

अकोला : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्रित लढवणार आहे. या संदर्भातील निर्णय भाजपचे प्रदेशाध्यक्ष, कार्यकारी अध्यक्ष आणि निवडणूक समिती घेईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. एखाद्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतही होऊ शकते, अशी शक्यताही त्यांनी व्यक्त केली. ते अकोल्यात माध्यमांशी बोलत होते. अकोल्यातील भूमिगत गटार योजनेसाठी लागणारा महापालिकेचा ३० टक्के भाग राज्य सरकार देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. तसेच जनतेने आम्हाला खुर्च्या तोडण्यासाठी सत्ता दिलेली नाही, तर विकासासाठी दिलेला आहे. आमचा भविष्यात ऑनलाईन कामावर भर राहणार आहे. वर्षाच्या अखेर पर्यंत आम्हाला सर्व ऑनलाईन करायचं आहे. तसंच विदर्भाचा बॅकलॉग २०२७ पर्यंत संपणार, असंही फडणवीस यांनी सांगितलं.

## मान्सून पुन्हा सक्रीय होण्याची चिन्हे

मुंबई: गेल्या काही दिवसांपासून राज्यात पावसाने दडी मारली आहे. खरीप हंगामाची तयारी केलेली असतानाच अचानक पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकऱ्यांचे टेन्शन वाढले आहे. मात्र, आता (दि.१३) जूनपासून पुन्हा एकदा राज्यात मान्सूनचे जोरदार कमबॅक होईल असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. तसेच पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला असून, राज्यातील एकूण १३ जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात मान्सून पुन्हा सक्रीय होण्याची चिन्हे असून, मुसळधार पाऊस बरसण्याचे भाकीत आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात राज्यात पावसाने चांगलाच धुमाकूळ घातला होता. या पावसामुळे राज्यात सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान झाले होते. तसेच शेतीपिकांनाही मोठा फटका बसला होता.

'या' जिल्ह्यांना अलर्ट

यलो अलर्ट - पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नांदेड, हिंगोली, चंद्रपूर, गडचिरोली, मुंबई आणि ठाणे

ऑरेंज अलर्ट - पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# भारतीयांच्या जन्मदरात लक्षणीय घट

नवी दिल्ली : संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालानुसार १४६ कोटी लोकसंख्येच्या भारताच्या जन्मदरात मागील काही वर्षांमध्ये सातत्याने घट होऊ लागली आहे. आता भारताचा जन्मदर १.९ टक्के एवढा कमी झाला आहे. याचा अर्थात भारतात एक महिला दोन किंवा त्यापेक्षा कमी मुलांना जन्म देत आहे. किमान २.१ टक्के जन्मदर असेल अर्थात प्रत्येक महिला किमान दोन मुलांना जन्म देत असेल तर संबंधित देशाच्या नव्या पिढ्या जन्माला येणे आणि त्यांनी उज्ज्वल भविष्यासाठी काम करणे हे प्रत्यक्षात घडू शकते. पण जन्मदर १.९ असेल तर नव्या पिढ्या निर्माण होण्याच्या प्रमाणातच घट होईल. यामुळेच ही चिंतेची बाब असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. जन्मदरात घट होण्याची प्रक्रिया अशीच पुढे सुरू राहिली तर आणखी काही दशकांनी भारतापुढे गंभीर आव्हानं निर्माण होण्याची शक्यता आहे.



संयुक्त राष्ट्रांनी जगातील १४ देशांचा आढावा घेतला. प्रत्येक देशाची लकसंख्या, तिथला जन्मदर अशी अनेक माहिती संकलित करण्यात आली. प्रत्येक देशातील नागरिकांशी चर्चा करुन त्यांचे पुढल्या पिढीला जन्म देण्याबाबतचे मत जाणून घेण्यात आले. यातूनच जन्मदरातील वाढ आणि घटीची प्रमुख कारणे समजली आहेत. भारतात जन्मदर १.९ टक्के एवढा कमी होण्याची काही प्रमुख कारणे आहेत. ही कारणे संयुक्त राष्ट्रांच्या अहवालातून हाती आली आहेत.

भारतात १३ टक्के दांपत्य निपुत्रिकपणाच्या समस्येमुळे पुढील पिढीला जन्म देण्यास असमर्थ आहेत. देशातील १४ टक्के दांपत्य गरोदरपणाशी संबंधित काही शारीरिक समस्यांमुळे पुढील पिढीला जन्म देण्यास असमर्थ आहेत. भारतातील १५ टक्के दांपत्य विशिष्ट आजारांमुळे पुढील पिढीला जन्म देणे टाळत आहेत. देशातली ३८ टक्के दांपत्य आर्थिक अस्थिरतेमुळे पुढील पिढीला जन्म देणे टाळत आहेत. विशेष म्हणजे जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेतही ३८ टक्के दांपत्य आर्थिक अस्थिरतेमुळे पुढील पिढीला जन्म देणे टाळत आहेत.

भारतातील २२ टक्के दांपत्य हक्काचे घर नाही म्हणून बाळाला जन्म देणे टाळत आहेत. देशातील २१ टक्के दांपत्य नोकरी - व्यवसायातील अस्थिरतेमुळे बाळाला जन्म देणे टाळत आहेत.

## भीषण अपघातात वधू-वरासह ५ जण जागीच ठार



जयपूर : राजस्थानच्या जयपूर येथे आज, बुधवारी ट्रक आणि जीपची धडक होऊन भीषण अपघात झाला. यामध्ये ५ जणांचा मृत्यू झाला असून ६ जण जखमी झाले आहेत. दौसा-मनोहरपूर मार्गावर भटकबास गावानजीक सकाळी ६.१५ वाजता झालेल्या या भीषण अपघातात लग्न करून घरी परतणारे वर-वधू देखील मृत्युमुखी पडलेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही वाहनांची समोरासमोर टक्कर झाली. जीपमधील लोक लग्न समारंभाला उपस्थित राहून मध्यप्रदेशहून परतत होते. स्थानिक लोकांकडून अपघाताची माहिती मिळताच पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले. लोकांच्या मदतीने मृतदेह गाडीतून बाहेर काढण्यात आले.जखमींना निम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यासंदर्भात रायसर पोलिस स्टेशनचे प्रभारी रघुवीर म्हणाले रीस अपघातानंतर महामार्गावर जाम झाला आणि गोंधळ उडाला. वऱ्हाडींची जीप मध्यप्रदेशहून मनोहरपूरला जात होती. जखमींचे जबाब घेतले जात आहेत. त्यानंतर कुटुंबातील सदस्यांना माहिती दिली जात आहे. काही गंभीर जखमींना एनआयएमएस रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# जागतिक मत्स्य उत्पादन क्षेत्रात भारताचा जगात दुसरा क्रमांक !

## देशाच्या वाढीव मत्स्य उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्राचे महत्वाचे योगदान

मुंबई : भारतातील अन्न उत्पादनातील एक महत्वाचे क्षेत्र म्हणून मत्स्य उत्पादन क्षेत्राकडे पहिले जाते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या दहा वर्षांत देशातील मत्स्य उत्पादन क्षेत्रात भरीव वाढ झाली आहे. जागतिक मत्स्य उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ८ टक्के असून, भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मासे उत्पादक देश बनला आहे. देशाच्या मत्स्य उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्राचे महत्वाचे योगदान असून राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या नेतृत्वात राज्यातील मत्स्यव्यवसायाला अधिक चालना मिळत आहे.





देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या गेल्या ११ वर्षांच्या काळात देशातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राचा कायापालट झाला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत मत्स्य उत्पादन क्षेत्राचे महत्वाचे योगदान आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्राला बळकटी मिळाल्याने जागतिक मत्स्यपालनात भारताचे स्थान अधिक मजबूत झाले आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताने तब्बल ६०,५२३.८९ कोटी रुपयांचे १७,८१,६०२ मेट्रिक टन (चढ) सीफूड निर्यात केले आहेत. यामुळे भारताच्या निर्यात क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली आहे.

मत्स्य उत्पादनात महाराष्ट्राचे भरीव योगदान

देशाच्या मत्स्य उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्राचे महत्वाचे योगदान आहे. राज्याचे मत्स्य व्यवसाय मंत्री श्री नितेश राणे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राला अधिक गती मिळत असून राज्यातील मत्स्योत्पादनामध्ये भरीव वाढ झाली आहे. सन २०२३-२४ मध्ये महाराष्ट्र राज्याचे सागरी मत्स्योत्पादन ४३४५७४ मे. टन इतके होते. सन २०२४-२५ मध्ये मंत्री नितेश राणे यांच्या कार्यकाळात राज्याच्या सागरी मत्स्योत्पादनामध्ये २९१८४ मे.टन ने वाढ झाली असून राज्याचे एकूण मत्स्योत्पादन ४६३७५८ मे. टन इतके झालेले आहे.

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारणा-२०२१) अंतर्गत होत असलेली प्रभावी अंमलबजावणी तसेच ड्रोनद्वारे होणारी देखरेख यामुळे राज्यातील अनधिकृत मासेमारीवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात सागरी मासेमारी संबंधी सर्वच उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून भविष्यात राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्र अधिक बळकट होणार आहे.

# शाळांच्या वेळापत्रकात बदल; आता शाळा सकाळी ७ ऐवजी ९ वाजता

पुणे : पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. राज्यातील शाळा येत्या १६ जूनपासून सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांसह पालकांनी शाळा सुरू होण्यापूर्वी तयारी सुरू केली आहे. शाळेसाठी नवीन दप्तर, वॉटर बॉटल, वह्या, पुस्तक खरेदी करणं सध्या सुरू आहे. अशातच शाळांच्या वेळापत्रकाबाबत महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शाळांचे वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. आता शाळा सकाळी सात ऐवजी ९ वाजता सुरू होणार आहे.

महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या शाळांबाबत महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरूवात येत्या १६ जूनपासून होणार आहे. नव्या शैक्षणिक वर्षापासून शाळांच्या वेळापत्रकात बदल होणार आहे. नव्या शैक्षणिक वर्षामध्ये राज्यातील शाळा सकाळी ७ ऐवजी ९ वाजता भरतील आणि सायंकाळी ४ वाजता सुटतील. म्हणजेच सकाळी ९ ते सायंकाळी ४ ही शाळेची वेळ असणार आहे. शाळांच्या नव्या वेळापत्रकानुसार, सकाळी ९ वाजल्यापासून ते ९.२५ पर्यंत परिपाठ राहिल. ९.२५ ते ११.२४ पर्यंत सुरूवातीचे ३ लेक्चर होतील. ११.२५ पासून ते ११.३५ पर्यंत १० मिनिटांची छोटी सुट्टी असेल. ११.३५ ते १२.५० पर्यंत दोन लेक्चर होतील. १२.५० ते १.३० वाजेपर्यंत मधली सुट्टी होईल. त्यानंतर १.३० ते ३.५५ वाजेपर्यंत उर्वरित लेक्चर होतील. त्यानंतर शेवटच्या ५ मिनिटांमध्ये वंदे मारतम होईल आणि शाळा सुटतील.

दरम्यान, राज्यामध्ये लवकरच शाळांच्या घंटा वाजणार आहे. उन्हाळी सुट्ट्या संपत आल्या असून आता लवकरच शाळा सुरू होणार आहे. महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या शाळा १६ जूनपासून सुरू होणार आहे. तर सीबीएसई बोर्डाची शाळा ९ जूनपासून सुरू झाल्या आहेत . राज्यातील ११ जिल्हे वगळता सगळीकडे शाळा १६ जूनपासून सुरू होणार आहेत. विदर्भामध्ये इतर विभागांच्या तुलनेत थोड्या उशिराने शाळा सुरू केल्या जातात.

## १४ जूनला शिवतीर्थावर येऊ नका; राज ठाकरे यांचे आवाहन

मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा १४ जून हा वाढदिवस. दरवर्षीप्रमाणे राज्यभरातून मनसैनिक या दिवशी मुंबईतील शिवतीर्थावर येऊन त्यांना शुभेच्छा देतात. मात्र यंदा ही परंपरा खंडित होणार आहे. राज ठाकरे यांनी स्वतः पत्राद्वारे मनसैनिकांना यावर्षी शिवतीर्थावर न येण्याचं आवाहन केलं आहे.

या वर्षी १४ जून रोजी म्हणजेच वाढदिवसाच्या दिवशी ते सहकुटुंब मुंबईबाहेर जाणार असल्याचे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे. मी वाढदिवस साजरा करणार नाहीये, किंवा काही विशेष कारण आहे असेही नाही. त्यामुळे कोणतेही वेगळे अर्थ काढू नयेत, असेही त्यांनी नमूद केले आहे.

राज ठाकरे यांनी आपल्या भावनिक पत्रात पुढे लिहिलं आहे की, गेली अनेक वर्षं तुम्ही वाढदिवसाच्या दिवशी भेटायला याल, हे निश्चित असतं. प्रत्येकाच्या भेटीचं, शुभेच्छांचं आणि प्रेमाचं मी ऋण मानतो. यंदा तुमचं दर्शन घडणार नाही, याची खंत राहील. पण मी लवकरच तुम्हाला भेटायला येईन. महाराष्ट्र सैनिकांशी संवाद साधण्यासाठी आणि त्यांचं दर्शन घेण्यासाठी पुन्हा भेट निश्चित आहे.

'लोकोपयोगी कार्य करा'

राज ठाकरे यांनी वाढदिवसाच्या दिवशी आपल्या भागात लोकोपयोगी कार्यक्रम राबवण्याचं आवाहन केलं आहे. तुमच्या भागात सामाजिक उपक्रम राबवले, तर तेच माझ्या वाढदिवसाचं खऱ्या अर्थाने औचित्य ठरेल, असं ते म्हणाले.

## जन्मा सोबतच पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र द्या : किशोर शितोळे

छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी

बाळाचा जन्म होतो त्याच ठिकाणी व त्याच वेळेस एक फुल व जन्म प्रमाणपत्र द्या, सामान्य नागरिकांना चकरा मारायला लावू नका अशा सुचना भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी घाटी प्रशासनाला केली. या भेटी दरम्यान औषधोपचार, रक्त पेढी, क्ष किरण उपचारा साठी लागणारे आधुनिक साहित्य तसेच प्रशासकीय व्यवस्थेतील विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत सर्व सामान्य जनतेस चांगली वैद्यकीय सेवा भेटत असल्याचे मत घाटी प्रशासनाच्या वतीने व्यक्त करण्यात आले.

शहरातील शासकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी भेट दिली. यावेळेस त्यांनी प्रभारी अधिष्ठाता श्रीनिवास गडप्पा व इतर डॉक्टर सोबत विविध विषयांवर चर्चा केली. यावेळेस जन्म नोंदणी प्रमाणपत्र जन्म झाले त्याच वेळेस त्याच ठिकाणी माता व पालकांना दिल्यास भ्रष्टाचार थांबेल. तसेच त्यांना चकरा मारायची गरज भासणार नाही अशी सुचना केली. या रुणालयात शहरातील तसेच ग्रामीण भागातील अनेक गरीब व गरजू लोक उपचार घेण्यासाठी येतात. त्यांनी तात्काळ हि सेवा पुरवल्यास भ्रष्टाचार थांबेल तसेच स्तुत्य उपक्रम राबवत असल्याची प्रतिमा तयार होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. यानंतर घाटी प्रशासनाच्या वतीने त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळेस त्यांच्यासोबत माजी नगरसेवक प्रदिप बुरांडे, राजेश मेहता, घाटीचे प्रभारी अधिष्ठाता डॉक्टर श्रीनिवास गडप्पा, डॉक्टर सुरेश हाबर्डे, डॉक्टर प्रसाद देशपांडे, वैद्यकीय अधिक्षक डॉक्टर गायत्री तडवळकर व इतर डॉक्टर उपस्थित होते.




## थेट पोटावर वार! वेटरला शिवीगाळ केली अन्...

सोलापूर : पत्रा तालिम येथील संदीप लक्ष्मण पाटील उर्फ भैय्या पाटील याच्यावर त्याच्याच ओळखीच्या तरूणाने आज सकाळी ९.३०च्या सुमारास चाकूने पोटात वार केले आहेत. विनायक बोगा असे त्या संशयिताचे नाव असल्याचे पोलिसांनी सांगितले. बार्शी रोडवरील भोगाव हद्दीत हा प्रकार घडला आहे. हॉटेलवरील वेटरला शिवीगाळ केल्याच्या कारणातून हे भांडण झाल्याचे सोलापूर तालुका पोलिसांनी सांगितले.

सकाळी ९.३० सुमारास भैय्या पाटील हा भोगाव हद्दीतील हॉटेल सुखसागरजवळ थांबला होता. त्यावेळी झालेल्या वादातून विनायक बोगा याने भैय्या पाटील याच्यावर चाकूने वार केले. त्यात भैय्या पाटलाच्या पोटावर वार झाले असून त्याला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

दरम्यान, भैय्या पाटील हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध यापूर्वी अनेक गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी त्याला तडीपार देखील केले होते. सोलापूर तालुका पोलिस अधिक तपास करीत आहेत. या भांडणात विनायक बोगा देखील जखमी असून त्याच्यावरही रूग्णालयात उपचार सुरू आहेत. दोघेही फार गंभीर जखमी नसल्याचे डॉक्टरांनी सांगितल्याचे पोलिस म्हणाले. अजून कोणीही पोलिसांत फिर्याद दिलेली नाही, असेही सोलापूर तालुका पोलिसांनी सांगितले.

# आषाढी यात्रेसाठी एसटीकडून ५,२०० विशेष बसचे नियोजन

पंढरपूर :आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्रा काळात ५ हजार २०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज येथे दिली.

आषाढी यात्रा नियोजनासाठी पंढरपूर येथे बोलावलेल्या एसटीच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

ग्रुप बुकींग असल्यास राज्याच्या कोणत्याही गावातून थेट पंढरपूर पर्यंत बस मिळणार

यावेळी परिवहन मंत्री प्रतापसरनाईक म्हणाले, यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगारात संपर्क साधावा असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केली आहे.

आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक-प्रवाशी पंढरपुरात येतात. अनेक प्रवाशी स्वत:च्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा विविध पालखींबरोबर चालत दिंडीने येतात या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. ४० पेक्षा जास्त भाविक प्रवाशांची संख्या असल्यास त्यांना त्यांच्या गावापासून विशेष बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. अर्थात या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत.

तसेच बस चालकांना व वाहकांना कोणाची राहण्याची व्यवस्था करावी त्याचबरोबर त्यांना आंघोळीसाठी गरम पाणी उपलब्ध करून द्यावे. बस स्थानकातून बस प्रवाशांना घेऊन जाण्याअगोदर बसची देखभाल दुरुस्ती करावी. एसटी बसच्या तात्काळ दुरुस्तीसाठी ज्यादा तांत्रिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी अशा सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी केल्या.

भाविक-प्रवाशांनी, एसटीच्या सुरक्षित प्रवासी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी यावेळी केले. तसेच यात्रा काळात पंढरपूर येथे येणाऱ्या सर्व एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चहा - नाश्ता व जेवणाची मोफत सोय करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री प्रताप सरनाईक यांनी दिली. गतवर्षी वर्षी एसटीने आषाढी यात्रेनिमित्त ५००० विशेष बसेस सोडल्या होत्या. याव्दारे यात्राकाळामध्ये सुमारे २१ लाख, भाविक - प्रवाशांची सुखरूप ने-आन एसटीने केली होती अशी माहिती राज्य परिवहन महामंडळाचे अधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लगाम

यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकीट न काढणे, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे अशाप्रकारे फुकट प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्याचे नियोजन केले आहे अशा फुकटया प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवूनअसणार आहेत.

वाहतूकीच्या नियोजनासाठी एसटीची मदत

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक प्रवासी आपल्या गावाकडे मार्गस्थ होतात अशा वेळी रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊन प्रवासाचा खोळंबा होतो यंदा स्थानिक पोलीस प्रशासनाच्या मदतीने ३६ पेक्षा जास्त वाहतूक नियंत्रक व सुरक्षा रक्षक वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी काम करणार आहेत. त्यामुळे रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी पोलीस प्रशासनाला एसटीची मदत होणार आहे.

यात्रा कालावधीत चार तात्पूरर्ती बस स्थानके उभारणार

पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून गाड्या सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठीयात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आदी सोयी-सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

# कळमनुरी, वसमत तालुक्यात ९२० हेक्टर फळबागांचे नुकसान

## ३६० घरावरील टीनपत्रे उडाली, ९० गोठ्यांचे नुकसान, महसूल मंत्री बावनकुळेंचे सर्वेक्षण करण्याचे आदेश







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जून**

कळमनुरी आणि वसमत तालुक्यात मागील दोन दिवसांत वादळी वाऱ्यामुळे तब्बल ९२० हेक्टरवरील फळबागा उध्वस्त झाल्या असून ३६० घरावरील टीनपत्रे उडाली आहेत. याशिवाय ९० गोठ्यांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. गजाननराव घुगे यांनी महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेत त्यांना नुकसानीची माहीती दिल्यानंतर मंत्री बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना तत्काळ नुकसानीचे पंचनामे करून शासनाकडे अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

सोमवारी सायंकाळी कळमनुरी तालुक्यातील डोंगरकडा, जवळा पांचाळ, सुकळीवीर, सालापूर, वडगाव, रैडगाव, गुंडलवाडी, डिग्रस, तरोडा, धानोरा तर वसमत तालुक्यातील गिरगाव, पांगरा शिंदे, वापटी आदीभागात वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे प्रंचड नुकसान झाले आहे. या भागात वाऱ्याचा जोर अधिक असल्यामुळे हाती आलेल्या केळीच्या बागा संपूर्णपणे उध्वस्त झाल्या. तर काही ठिकाणी पपईचे नुकसान झाले. लाखो रूपये खर्च करून मागील वर्षभरापासून तळहातावरील फोडाप्रमाणे जपलेल्या केळीच्या बागा अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे उध्वस्त झाल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. खाजगी कर्ज, बँकेचे कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत शेतकरी आहे.

यासंदर्भात भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मुंबई येथे भेट घेत संपूर्ण परिस्थिती आणि नुकसानीची माहीती दिली. यावेळी दिलेल्या पत्रात आखाडा बाळापूर, डोंगरकडा, कुरूंदा या परिसरात मोठ्या प्रमाणात वादळी वाऱ्यासह अतिवृष्टी झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या केळी बागांचे तसेच इतर पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच घरांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तत्काळ पंचनामे करून शेतकरी व नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत करावी.

यावेळी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तत्काळ हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना संपर्क साधून नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून तत्काळ शासनाकडे अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. अहवाल प्राप्त होताच पात्र शेतकऱ्यांना तत्काळ मदत करण्याचे आश्वासन यावेळी मंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत.

त्यानुसार महसूल विभागाच्यावतीने नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम युध्दपातळीवर मंगळवापासूनच सुरू करण्यात आले आहेत.

कळमनुरी, वसमत तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे केळी बागांचे प्रचंड नुकसान झाले असून दि १० जून रोजी ठाकरे गटाचे हिंगोलीचे खा नागेश पाटील आष्टीकर, माजी आ. डॉ संतोष टारफे, जिल्हाप्रमुख गोपू पाटील यांनी डोंगरकडा परिसरातील गावांना भेटी देत नुकसानीची पाहणी केली तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधला.

दरम्यान, जिल्ह्यात वादळी वाऱ्यामुळे नुकसानीची माहीती तातडीने सादर करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्यानंतर कळमनुरीच्या उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते, तहसीलदार जीवककुमार कांबळे यांच्या पथकाने नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आहे. तसेच वसमत तालुक्यात उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार शारदा दळवी यांच्या पथकाने नुकसानग्रस्त भागाला भेटी दिल्या असून युध्दपातळीवर पंचनामे करण्याचे काम प्रशासनाने सुरू केले आहे.

प्राथमिक अंदाजानुसार कळमनुरी तालुक्यात ७७० हेक्टरवरील फळबागांचे नुकसान झाले आहे तसेच ३६० घरावरील टीनपत्रे उडाली आहेत. ९० गोठ्यांचे नुकसान झाले आहे. वसमत तालुक्यात गिरगाव, पांगरा शिंदे, वापटी यासह परिसरात १५० हेक्टर फळपिकांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. पुढील दोन दिवसात नुकसानीचे अंतीम क्षेत्र स्पष्ट होणार आहे. त्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शासनाकडे मदतीचा प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे.

# अवैध दारू विक्रेत्यांना पोलिस अधीक्षकांनी दिली तंबी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जून**

जिल्ह्यात अवैध दारू विक्री करणाऱ्याविरोधात पोलिसांनी धडक मोहीत उघडली असून बुधवारी अवैध दारू विक्री करणाऱ्यांना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी कार्यालयात बोलावून त्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. तसेच त्यांच्या कठोर प्रतिबंधात्मक कार्यवाही करून यापुढे अवैधदारूविक्री किंवा हातभट्टी दारू विक्री करतांना आढळून आल्यास एमपीडीए, हद्दपार, संघटीत गुन्हेगारी सारखी कठोर कार्यवाही करण्यात येणार असल्याचा इशारा दिला.


पोलिस विभागाच्यावतीने अवैध दारू विक्री विरोधात कठोर कार्यवाही करणयत येत असून यापुढे सुध्दा पोलिस ठाणे स्तरावर विशेष पथकांची स्थापना करून अवैध दारू विक्री, हातभट्टी विकणाऱ्यावर कार्यवाही करून अटक करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण, स्थानिक गुन्हे शाखा, विशेष पथक यांना विशेष मोहीमेद्वारे अवैध दारू विक्री विरोधात कठोर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने जिल्ह्यात कोणीही अवैध दारू विक्री, हातभट्टी विक्री, नशाकारक पदार्थ यांची विक्री, वाहतुक किंवा निर्मिती करून नये अथवा स्वत: जवळ बाळगू नये असे आवाहन पोलिस विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.



**हिंगोली– बासंबा येथील स्व हेडगेवार स्मृती दंत महाविद्याल्याच्यावतीने येथील जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचारी यांची दंत तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थीनींनी दंत तपासणी करून मार्गदर्शन केले. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### सहाय्यक जिल्हाधिकारी योगेशकुमार मीना रूजू



हिंगोली– सन २०२४ च्या तुकडीतील परिविक्षाधीन भारतीय प्रशासन सेवेतील ८ अधिकाऱ्यांचे लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी मसुरी येथे प्रशिक्षण १८ एप्रिल रोजी पूर्ण झाले. या अधिकाऱ्यांना सहाय्यक जिल्हाधिकारी जिल्ह्यात पदस्थापना देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. ज्यामध्ये हिंगोली जिल्ह्यात सहाय्यक जिल्हाधिकारी योगेशकुमार मिना यांची नियुक्ती केली आहे. ९ जूनला ते रुजू झाले असुन जिल्ह्यातील अनेक शासकीय कार्यालयात रोटेशन पध्दतीनूसार कामकाज हाताळणी करणार आहेत. त्यांचा हिंगोली जिल्ह्यात सन २०२६ पर्यंत कार्यकाळ राहणार आहे.

### गिरगावात एक दिवस, गावकऱ्यांसोबत उपक्रम



वसमत– तालुक्यातील मौजे गिरगांव येथे बुधवार दि ११ जून रोजी एक दिवस गावकऱ्यासोबत ग्राम दरबार आयोजित करण्यात आला त्यामध्ये नागरिकांच्या समस्या सोडविण्यात आल्या. विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी दिलेल्या सूचनेनुसार ग्रामीण भागातील शासनाच्या विविध योजना उपक्रम व सेवा ग्रामीण भागात काम करणाऱ्या विविध ग्रामविकासांच्या अधिकाऱ्यामार्फत प्रत्येक गावामध्ये ठराविक कालावधीत पोहोचविण्याच्या अनुषंगाने एक दिवस गावकऱ्यासोबत ग्राम दरबार हा नावीन्यपूर्ण उपक्रम दिनांक ११ जून २०२५ रोजी गिरगांव येथे पार पडला. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उमाकांत तोटावाड व सहाय्यक गट विकास अधिकारी अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमास अध्यक्ष प्रमोदरावजी नादरे पाटील सरपंच हे होते. प्रमुख उपस्थिती कोकरे विस्तार अधिकारी पंचायत, पांचाळ, गोलेवार, सूर्यवंशी, दरगु, श्रीमती तोंडापुरे मॅडम, गीते, दातार, श्रीमती चिलकेवार, रमेशराव दाळपुसे, अंजनवाड, नवाज आली, पत्रकार बंधू सर्व नागरिक सर्व सदस्य अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस,आशा वर्कर, ग्रामपंचायत कर्मचारी, इतर विभागाचे सर्व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. अधिकारी कर्मचारी यांनी गावातील नागरिकांनी मांडलेल्या समस्यांचे निराकरण गावातच केले. गावात ग्राम पंचायत अभिलेखे तपासणी, आरोग्य शिबिर, पशूंचे लसीकरण, घनकचरा व्यवस्थापन, इत्यादी प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन बालासाहेब कदम ग्रामपंचायत अधिकारी यांनी केले.

# हिंगोली शहरात मंगळवारी वादळी वाऱ्यासह पाऊस



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जून**

शहरात मंगळवार दि १० जून रोजी सायंकाळी वादळी वाऱ्यासह पावसाला सुरूवात झाली. यावेळी जिल्हा परिषद रस्त्यावरील झाडे उन्मळून रस्त्यावर पडली होती.

शहरात मागील आठवड्यात तापमानात वाढ होत असल्यामुळे नागरिक उकाड्यामुळे हैराण झाले होते. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्यासह पावसाला सुरूवात झाली. या वाऱ्यामुळे जिल्हा परिषद रोडवरील झाडे रस्त्यावर पडल्यामुळे वाहतुक विस्कळीत झाली होती तसेच शहरात सगळीकडे धुळीचे डोंब उडत असल्यामुळे नागरिकांची चांगलीच धावपळ झाली. वीजेच्या तारा आणि वीजेच्या खांबाच्या काही ठिकाणी नुकसान झाले त्यामुळे शहरातील वीज पुरवठा रात्री उशिरापर्यंत बंद होता. वादळी वाऱ्यामुळे पावसाचा जोर कमी होता. एक तास पाऊस पडला.

# शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी ठाकरे गट आक्रमक, चार तालुक्यात मोर्चा, आज हिंगोलीत रास्ता रोको



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ जून**

विधानसभा निवडणुकीच्यावेळी सरकारने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते परंतु या आश्वासनासह इतर आश्वासनाची पूर्तता न केल्यामुळे ठाकरे गट आक्रमक झाला असून क्या हुआ तेरा वादा अशा घोषणा देत चार तालुक्यात ठकारे गटाच्यावतीने तहसील कार्यालयावर मोर्चा काढून प्रशासनाला निवेदन सादर केले. गुरूवारी हिंगोली येथे ठाकरे गटाच्यावतीने या मागण्यांसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा वादा केला होता. मात्र निवडणुकीत यश मिळवल्यानंतर सरकारला त्यांनी दिलेल्या वाद्याचा विसर पडला. यावरून ठाकरे गटाने क्या हुआ तेरा वादा आंदोलन करीत शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

यासाठी दि ११ जून रोजी ठाकरे गटाच्यावीने चार तालुक्यात तहसील कार्यालयावर मोर्चा काढून तहसीलदारमार्फत शासनाला निवेदन सादर केले आहे. कळमनुरी येथे माजी खासदार शिवाजीराव माने, माजी आ. डॉ संतोष टारफे, जिल्हाप्रमुख गोपू पाटील, बाळासाहेब मगर, डी के दुर्गे, नागोराव करंडे, रूपेश देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तहसीलदारांना निवेदन सादर केले.

औंढा नागनाथ येथे तालुका प्रमुख गणेश देशमुख यांच्या नेतृत्वात, सेनगाव येथे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, माजी सभापती रूपाली पाटील गोरेगावकर, दिनकरराव देशमुख, परमेश्वर मांडगे, प्रवीण महाजन, उध्दवराव गायकवाड वसमत येथे सुनील काळ, अनिल कदम, उध्दव सावंत, काशिनाथ भोसले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयावर मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन सादर केले.

गुरूवार दि १२ जून रोजी ठाकरे गटाच्यावतीने शासनाच्या विरोधात सकाळी ११ वाजता हिंगोली ते कनेरगाव महामार्गावरील दंत महाविद्यालयाजवळ रास्तारोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहीती जिल्हाप्रमुख गोपू पाटील यांनी दिली आहे.

# एकाच वर्षात जिल्हा परिषद षटकोनी सभागृहातील सिलींगसह फर्निचरची दुरावस्था





**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, ११ जून**

येथील जिल्हा परिषदेच्या षटकोनी सभागृहाचे मागील वर्षीच कंत्राटदरामार्फत काम करण्यात आले. सौदर्यीकरणासह सिलींग व इतर कामे करण्यात आली परंतु एकाच वर्षात सिलींगचे तुकडे गळून खाली पडत आहेत तर फर्निचरचे कामही निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिसत आहे. संबंधितावर कार्यवाही करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

येथील जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभा, स्टँडीग समितीच्या बैठका तसेच इतर बैठकांचे आयोजन षटकोनी सभागृहत करण्यात येते. या सभागृहाच्या सौंदर्यीकरणासह सिलींग आणि फर्निचर तसेच बांधकाम, रंगरंगोटीचे काम मागील वर्षी करण्यात आले. यासाठी लाखो रूपयांचा खर्च जिल्हा परिषदेच्यावतीने करण्यात आला. परंतु आजघडीला षटकोनी सभागृहाची दुरावस्था झालेली दिसत आहे. सभागृहातील सिलिंग गळून पडत असतांना दिसत आहेत. सभागृहातील व्यासपीठावरील बसवलेल्या सिलींगचेही तुकडे गळून पडतांना दिसत आहेत. एकाच वर्षात कामाचे बिंग बाहेर पडले असून सदरील काम हे निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिसत आहे. संबंधित कंत्राटदारावर जिल्हा परिषद प्रशासन काय कार्यवाही करते याकडे आता लक्ष लागले आहे.

# महागाव येथे कर्जामुळे शेतकऱ्याची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**कुरूंदा, ११ जून**

वसमत तालुक्यातील महागाव येथे अल्पभूधाकर शेतकऱ्याने ९४ हजार रूपये कर्जामुळे आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मंगळवारी कुरूंदा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार महागाव येथील शेतकरी नवनाथ जाधव वय ३५ यांना महागाव शिवारात दोन एकर शेत आहे. घरी पत्नी, तीन मुली असा परिवार आहे. शेतीवरच त्यांना उदरनिर्वाह चालतो. शेतीवर भारतीय स्टेट बँकेकडून ९४ हजार रूपयांचे कर्ज घेतले होते. याशिवाय त्यांनी गृहकर्ज व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेकडूनही कर्ज घेतले होते. दोन एकर शेतीता त्यांनी खरीप हंगामात सोयाबीन तर रब्बी हंगामात हरभरा व इतर पिके घेतली होती. मात्र अतिवृष्टीमुळे खरीप हंगामात लागवडीचा खर्चही निघाला नाही तर हीच परिस्थिती रब्बी हंगामातही झाली. त्यामुळे कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत दि ९ जून रोजी नवनाथ यांनी राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या केली. घटनेची माहीती मिळताच सपोनि रामदास निरदोडे, जमादार सवंडकर, पोले यांचे पथकाने घटनास्थळी पाहणी केली. याप्रकरणी विमलबाई यांच्या फिर्यादीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

# जिल्ह्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ सादर करा: सावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.११ जून -**

जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणात पाऊस होत आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकासह पशु, कच्चा घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याबाबत पालकमंत्री अतुल सावे यांनी सर्व परिस्थितीची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्याकडून घेतली व जिल्ह्यात झालेल्या या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून शासनास अहवाल सादर करावा, अशी सूचना केली.



अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावर निर्णय घेऊन नुकसानग्रस्तांना त्वरीत मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस झालेल्या मंडळामध्ये कंधार तालुक्यात कंधार मंडळात ८५.७५ मिमी, कुरूळा ८६.००, फुलवळ ६८.७५, उस्माननगर ८१.७५, लोहा तालुक्यात लोहा, सोनखेड व कलंबर मंडळात प्रत्येकी ८१.७५ तर किनवट तालुक्यात जलधरा ७२.७५, शिवनी मंडळात ६९.२५ मि.मी. एवढ्या पाऊसाची नोंद झाली आहे.

# प्राणिताताई देवरे यांचा वटपौर्णिमा निमित्त अकरा वर्षा पासून 'एक वृक्ष,एक जीवन' उपक्रम

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि ११ जून -**

सामाजिक उपक्रम राबविताना त्यात सातत्य ठेवणारे फारच मोजके असतात. लोहा कंधार पर्यायाने जिल्ह्यात आपल्या कार्याची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या भाजपा महिला आघाडी प्रदेश उपाध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी एक वृक्ष -एक जीवन या अंतर्गत वटपौर्णिमा निमित्ताने गेल्या अकरा वर्षा पासून लोहा कंधार मध्ये महिलांना वटवृक्ष वाटप कारताहेत.अखंडितपणे चालणार हा पर्यावरण संवर्धन करणारा उपक्रम राबवित आहेत.त्यामुळे वडाच्या झाडांची लागवड मोठ्या प्रमाणात झालेली पहावयास मिळते.

भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा



प्राणिताताई देवरे चिखलीकर या लोहा कंधारसह जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागात विविध सामाजिक उवक्रम राबवित असतात.शिवाय वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी त्या उपस्थित असतात एक दिवशी सात आठ लग्न सोहळे , वाढदिवस ,असे विविध कार्यक्रमासाठी त्या जातात.वर्षातून दोन उपक्रम आवर्जून राबवितात वटपौर्णिमा आणि मकर संक्राती निमित्ताने वाण वाटप हे दोन कार्यक्रम गेल्या अनेक वर्षांपासून प्राणिताताई या दोन्ही तालुक्यात व जिल्ह्यावर आवर्जून घेत असतात. लोहा व कंधार शहरात वटपौर्णिमा (१०जून) निमित्ताने महिलांना वडाचे रोपटे तानी वाटप केले .सलग अकरा वर्षा पासून त्या आवर्जून हा उपक्रम घेत असतात,लोहा शहरातील देऊळ गल्ली येथे वटपौर्णिमा निमित्ताने महिलांना वटवृक्ष देण्यात आला प्राणिताताई देवरे चिखलीकर म्हणाल्या की, आरोग्य उपयोगी व पर्यावरणाचे संवर्धन करणारा हा उपक्रम आहे पण स्त्रियांसाठी आजच्या दिवसाचे महत्व अधिक आहे या धार्मिकतेची सांगड घालत आम्हा महिलासाठी अंत्यत महत्वाचा असलेला हा वटपौर्णिमा सण साजरा होतो पण सोबत वडाचे झाड लावण्याचा हेतू साध्य होतो आहे याचा मनस्वी आनंद वाटतो सर्वमहिला एकत्रित येऊन दरवर्षी आपण हा सण साजरा करतो आहोत असे सांगून त्यांनी लाडकी बहीण तयोजनेचे महत्व अधोरेखित केले. देशाचे पंतप्रधान .नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या महिला धोरणाची माहिती दिली व महायुतीचे सरकार महिलांच्या हितासाठी वेगवेगळे निर्णय घेत आहेत याचीमाहिती प्राणिताताई यांनी दिली कार्यक्रमास महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव शोभा ताई बगाडे,माजी .नगरसेविका.कल्पनाताई चव्हाण मुकदम ,पंचायत समिती माजी सदस्या .सुरेखा वाले,डॉ. सविता घंटे,अलका कनकदंडे ज्योती रहाटकर सुवर्णा क्षीरसागर यांच्यासह शहरातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होत्या.

## संक्षिप्त वृत्त

### महाराष्ट्र शासनाचा शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक अल ईम्रान प्रतिष्ठानला प्रदान

**बिलोली** -महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने अल ईम्रान प्रतिष्ठान बिलोली या संस्थेस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते दि.१० जुन २०२५ मंगळवारी दुपारी १२:३० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभागृह,जगन्नाथराव भोसले मार्ग,नरीमन पाईंट,मुंबई येथे संस्थेचे अध्यक्ष डा.मोहसीन खान,सचिव ईंजि.ईम्रान खान यांना शाहू,फुले,आंबेडकर पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने दरवर्षी राज्यातील उत्कृष्ट कार्य करणा-या संस्थाना शाहू,फुले,आंबेडकर पारितोषिक दिले जाते.सन २०२३-२०२४ या वर्षीचा शाहू,फुले,आंबेडकर पारितोषिक अल ईम्रान प्रतिष्ठान,बिलोली या संस्थेला (स्क्मानपत्र,स्मृतीचिन्ह,शाल,श्रीफळ) संस्थेचे अध्यक्ष डा.मोहसीन खान,सचिव ईंजि.ईम्रान खान यांना दि.१० जुन ला मुंबई येथे पुरस्कार वितरण सोहळ्यात देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यास व्यासपिठावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथरावजी शिंदे, सामाजिक न्यायमंत्री ना.संजय शिरसाट, जलसंधारण मंत्री ना.संजय राठोड, रोहयो व फलोत्पादन मंत्री ना.भरतशेठ गोगावले आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सदरिल कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदिप कांबळे यांनी केले. तर सुत्रसंचलन हर्षल पाटील, पुनम चांदुरकर व आभार समाजकल्याण चे प्रभारी आयुक्त प्रविण पुरी यांनी मानले.अल ईम्रान प्रतिष्ठानला मिळालेल्या पुरस्काराबद्दल खा.अशोकरावजी चव्हाण,खा.अजित गोपछडे,आ. हेमंत पाटील,आ.बालाजी कल्याणकर,आ.विक्रम काळे,आ.सतीश चव्हाण,आ.आनंदराव बोंढारकर,आ.जितेश अंतापूरकर,सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे, एस.एस.पाटील, के.बी.राठोड,रामदास पेंडकर यांच्यासह संपादक,पत्रकार, मित्रपरिवार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

### विलास गजभारे यांच्या वाढदिवसानिमित्त महिला कर्मचाऱ्यांना साड्यांचे वाटप



**नवीन नांदेड** - सिडको येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भीम कायदा सामाजिक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष विलास गजभारे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे वृक्षारोपण व सिडको झोन येतील साफसफाई महिला कर्मचाऱ्यांना साड्यांचे वाटप करण्यात आले. सडको येथील सामाजिक कार्यकर्ते विलास गजभारे यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १० जून रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथे विविध फुलांच्या झाडांचे वृक्षारोपण करून सिडको येथील महानगरपालिका कार्यालय अंतर्गत साफसफाई काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना साड्यांचे वाटप करण्यात आले. व तसेच माघ पौर्णिमा व वाढदिवसानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे खीर व भोजनदानाचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. विलास गजभारे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सुविध्य पत्नी नम्रता गजभारे यांच्या हस्ते साफसफाई महिला कर्मचारी भारतबाई जोंधळे, सारिकाबाई मल्हारे, शांताबाई हटकर, स्वर्णाबाई भालेराव, उज्वलाबाई मोरे, स्वाती कांबळे यांना साड्यांचे वाटप कण्यात आले. यावेळी सिडकोतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पी एस गवळे, बा.रा. वाघमारे, एकनाथ वाघमारे, शाहिर गौतम पवार,पांडुरंग वाडे, माधव डोम्पले, चंद्रकांत डोम्पले, आर.जे. वाघमारे, रावसाहेब सावते, माजी सैनिक भालेराव, बन्सी गजभारे, मनोहर कोकरे यांनी उपस्थित राहून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व साडी वाटप हा उपक्रम स्तुत्यअसल्याचे मत व्यक्त केले. तर याप्रसंगी पंडित गजभारे, रावसाहेब भुरे, बालाजी गायकवाड, संजय गायकवाड,व्यंकट इंगळे, भगवानदास पैठणे, बालाजी महाबळे, वैभव लांडगे, चंद्रकांत सावंत, कल्याण आढाव, बंटी कोकरे, राष्ट्रवादीच्या जिल्हा संघटक सचिव उषाताई मोरे, कौशल्याबाई सावते, नम्रता गजभारे, गायकवाड ताई, कविता वाडी, मस्के मावशी, संगमित्रा भुरे यांची उपस्थिती होती तसेच सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सम्राट आढाव, प्रदीप हानवते, राजू लांडगे, डि.के.कांबळे, प्रसेनजीतवाघमारे, संदीप महाबळे, आकाश सोनकांबळे, सुनिल वडगावकर,अनिल मोरे, राजू निकाते, गोविंद कांबळे, मुन्ना वाडे आदींनी परिश्रम घेतले.

### नांदेड ते बिदर राज्य मार्गाला साठवण तलावाचे स्वरूप

**हाणेगाव**-नांदेड जिल्ह्यातील सर्वात शेवटचा तालुका म्हणजे देगलुर आणि शेवटचा गाव हाणेगाव असुन हे कर्णाटक आंध्रा महाराष्ट्र राज्याच्या सिमेवरती वसलेले गावे असल्यामुळें या रस्त्यावर नेहमी वरदळ असते आणि विशेष करुन नांदेड येथे गुरु गोविंदसिंग यांचा गुरुद्वारा आहे तर बिदर येथे गुरु नानकजी यांचा गुरुद्वारा असल्यामुळें शिख भाविकांचे पवित्र स्थळ येथे असल्यामुळें या रस्त्यावरुन सर्वात जास्त प्रवाशांची ये-जा असते.ग्रामिण भागातील लोकांना मोठी बाजारपेठ देगलुर असल्यामुळें नेहमी या रस्त्यावर रहदारी असते प्रवाशांना रस्त्यात खड्डा की खड्यात रस्ता हेच कळेनासा झाला आहे. वाहनधारकांना वाहन चालवताना अक्षरशः तारेवरची कसरत करत वाहन चालवावं लागतो आहे वरुन विशेष करुन याच रस्त्याला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा ही देण्यात आला आहे सध्या देगलुर हाणेगाव रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडुन पाणी भरुन याची अवस्था साठवण तलावासारखी झाली आहे म्हणुन हा रस्ता आहे की,साठवण तलाव असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजुला काटेरी झुडपे झाल्यामुळे अपघात होण्याचे प्रमाण देखील वाढले असुन याकडे संबंधीत विभागाने गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे तर पावसाळ्यापूर्वी रस्त्यावरील खड्डे बुजवुन होणारे अपघात टाळण्यासाठी तात्काळ रस्ता सोयीचा करण्यात यावा अशी मागणी प्रवाशी वर्गातुन होत आहे.

# हिंदी चित्रपटाचा 'नायक' पत्रकारिता शिक्षणातही 'सुपरस्टार'

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.११ जून -**

येथील श्री गुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयाच्या बी. ए. एम. सी. जे. पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमाचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी शुशांत प्रशांत ठमके हा ७०.८८ टक्के गुण घेऊन उच्चश्रेणीत महाविद्यालयातून सर्वप्रथम ठरला आहे. विविध कलागुणांनी निपुण असलेला शुशांत ठमके यांनी क्रीडा, कला क्षेत्राबरोबरच पत्रकारिता शिक्षणाच्या अभ्यासक्रमातही आपण अग्रेसर असल्याचे या निकालावरून दाखवून दिले आहे. शुशांत ठमके हा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत झालेल्या तायक्वांदो स्पर्धे तही यशाच्या शिखरावर पोहोचला. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर त्याने या क्रीडा प्रकारामध्ये पुरस्कार प्राप्त केले.



श्री गुरुनानाकदेव विद्यापीठ अमृतसर येथे झालेल्या अखिल भारतीय यूनिवर्सिटी स्पर्धेत शुशांत ठमके याला तायक्वांदो या क्रीडा प्रकारात सिल्वर मेडल मिळाले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या इतिहासात पहिल्यांदा हे पहिल्यांदाच घडले आहे. एवढ्यावरच न थांबता शुशांत ठमके यांनी अलीकडेच बॉलीवूडमध्ये प्रवेश करून 'पिंटू की पप्पी' या हिंदी चित्रपटामध्ये प्रमुख नायकाची भूमिका साकारली आहे. चित्रपट क्षेत्रात काम करताना सुद्धा त्याने पत्रकारिता अर्थात मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम शिक्षणालाही प्राधान्य दिले. पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमात त्याने उच्चतम श्रेणी प्राप्त केली.

या पदवीपुर्वी सुशांतने महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत शासकीय कृषी महाविद्यालय पुणे येथून बी एससी (हॉनर्स) ही पदवी विशेष प्रावीण्यात संपादन केलेली आहे.

किनवट येथील शैक्षणिक क्षेत्रातले अग्रणी तसेच सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे इंजिनिअर प्रशांत ठमके यांचा सुशांत हा सुपुत्र आहे. श्री गुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास कदम, प्रा. सुरेश पाटील, प्रा. डॉ. शुद्धोधन एडके, प्रा. अमोल धुळे, प्रा. संजय नरवाडे, प्रा. विपिन कदम प्रा. शारदा कुलकर्णी शिक्षकेतर कर्मचारी अनिल विनायते, भारत सोनटक्के आदींनी या यशाबद्दल शुशांत ठमके याचे कौतुक केले आहे.

# कल्याणी झडते यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.११ जून -**



उमरी यशवंत हायस्कुल ज्यू कॉलेज येथिल शिक्षक सतिश झडते यांच्यी पत्नी सौ . कल्याणी उर्फ आशा सतिश झडते यांचे दि ९ जून २०२५ रोजी सायकांळी ८:०० वाजता अल्पशा वयात निधन झाले आहे त्यांचे मृत्यू समयी ३३ वर्ष होते . त्यांचा अंत्यसंस्कार दि १० जुन रोजी दुपारी दोन वाजता उमरी वैकुंकट स्मशान भुमित करण्यात आला आहे. त्यांच्या पश्च्यात त्यांचे पती , एक मुलगा , सासू - सासरे, देर असा मोठा परिवार आहे. शिक्षक सतिश झडते यांच्या त्या पत्नी तर पत्रकार अशोक झडते यांच्या भाभी आणि पत्रकार प्रशांत जोंधळे यांच्या भाच्याची पत्नी होत.

# 'क्या हुआ तेरा वादा' अशा घोषणा देत सरकारच्या विरोधात शिवसेनेचा तहसील कार्यालयावर मोर्चा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.११ जून -**

शिवसेना उ.बा.ठा.गटाचे तालुका प्रमुख पिंटू पाटील वासरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ११ जुन रोजी ठाकरे चौकातुन शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर, बैलगाडी,घेऊन सरकारच्या विरोधात क्या हुआ तेरा वादा, शेतकऱ्यांचे कर्जमाफी, व लाडक्या बहिणीचे २१०० रुपये देण्यात यावे अशा घोषना देत तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला.



निवडणूक काळात महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी , शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत १५ हजार देऊ, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत २१०० रुपये महिना देऊ, राज्यातील ४५ हजार गावात पानदन रस्ते करू, शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतावर जीएसटी मुक्त करू, पिक विमा एक रूपयात देऊ, वृद्ध पेन्शन धारकांना २१०० रुपये महिना मानधन देऊ, शेतकऱ्यांना २४ तास वीज उपलब्ध करून देऊ, शेतीमालास हमीभाव देऊ, बी बियाण्यांच्या किमतीवर नियंत्रण ठेवू , हर घर जल हर घर छत योजना यशस्वीपणे राबवु, मराठवाडा वॉटर ग्रीड केंद्राकडून यशस्वीपणे मान्यता करून घेऊ असे अनेक आश्वासने महायुतीच्या नेत्यांकडून निवडणुकी काळात देण्यात आले होते परंतु आता महायुतीच्या नेत्यांना दिलेल्या आश्वासनांचे विसर पडले असल्याने शिवसेना उबाठा पदाधिकाऱ्यांच्या वतीने सरकार क्या हुआ तेरा वादा अशा घोषणा देत सरकारने दिलेल्या आश्वासनाची आठवण करून दिली तसेच मृगनक्षात्राच्या पहिल्याच पावसाच्या तडाख्याने केळी व इतर पिकांचे प्रंचड नुकसान झाले आहे यामध्ये सरसकट पंचनामा करून नुकसान भरपाई देण्यात यावे अशा मागणीचे निवेदन तहसील कार्यालयात नायब तहसीलदार मारोती जगताप यांना शिवसेना जिल्हाप्रमुख बबन बारसे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवेदन सादर करण्यात आले

यावेळी विधानसभा प्रमुख विश्वंभर पाटील पवार, उपतालुकाप्रमुख माणिक लोमटे, उपतालुकाप्रमुख बाबुराव कळणे, उप तालुका प्रमुख आनंदराव जाधव, शहरप्रमुख, अविनाश झमकडे, अंकुश मामीडवार, सचिन चंद्रे, साहेबराव चव्हाण, रणजित देशमुख वाडीकर, पांडू पाटील मोरे, बाळू चंद्रे, राजन वडे, कामाजी पाटील, किशन खतगावे, सोनू अरेपल्लू संभाजी गाडे यांच्यासह मोठ्या संख्येत शिवसैनिकांची उपस्थिती होती.

मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबासाहेब कांबळे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे यांच्या सह पोलीस कर्मचारी किशोर पाटील ,चंद्रशेखर मुंडे, अरविंद शिंगारपुतळे,विजय आलेवार , झुंझारे , आर सी बी प्लाटून ( पथक) यांनी चोक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# आजीचा खूना करणाऱ्या नातवाला चार दिवसाची पोलीस कोठडी

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.११ जून -**

हिमायतनगर तालुक्यातील टेंभुर्णी येथील घटना घर बांधण्यासाठी बँकेचे घेतलेले कर्ज तसेच उधाऱ्या फेडण्यासाठी नातवाने आजीला ठार केल्याची घटना पोलीस तपासात समोर आली असून हिमायतनगर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी संयुक्त तपास करत गुन्ह्याची उकल केली. नातवाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून न्यायालयाने चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

हिमायतनगर तालुक्यातील टेंभूर्णी या गावात ७५ वर्षे वयोवृद्ध असलेल्या गयाबाई रामजी तवर उर्फ देवसरकर हिचा खून करुन अज्ञाताने दागिने व रोख रक्कम असा एकूण पावणेतीन लाख रुपयाचा ऐव पळविल्याची घटना दि. ३ जून ते ५ जून या कालावधीत घडली होती. सदर प्रकरणात हिमायतनगर ठाण्यात अज्ञात विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान पोलिसांनी घटनेच्या काळामध्ये टेंभूर्णी गावात कोण कोण येऊन गेले, गावातील कोणी नातेवाईक किंवा जवळचे काय काय विचारणा करत होते,कोणाच्या आचरणात बदल झाला का, मयताच्या विवाहित मुलींचे काही जमिनीचे किंवा आर्थिक वाद होते का, यासह अन्य बारीकसारीक गोष्टीचाही तपास करण्यात आला. मयत महिलेला तीन मुली असून त्या दिवशी सरसम व टाकळी येथे राहतात. त्या ठिकाणीही पोलिसांच्या पथकाने विचारणा केली. याच दरम्यान मयत महिलेची मोठी मुलगी शांताबाई पांडुरंग वानखेडे (दिघी) यांचा मुलगा बाळू वानखेडे हा संशयास्पद जाणवत असल्याने त्याची चौकशी केली. घरबांधकामासाठी बाळूने घेतलेल्या बँकेच्या कर्जासाठी बँकेचे अधिकारी घरी घेऊन गेल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

या पार्श्वभूमीवर बाळू वानखेडे याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता बँकेचे कर्ज व लोकांच्या उधाऱ्या फेडण्यासाठी आजीचा खून करुन दागिने व रोख रक्कम घेतल्याची कबुली बाळू वानखेडे यांनी दिली. या गुन्ह्यातील ५८ हजार रुपयाचे दागिने हस्तगत करण्यात आले असून आरोपीला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

# फिरोजपूर - हजूर साहिब नांदेड नवीन साप्ताहिक एक्सप्रेस : खा. डॉ. गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.११ जून -**

फिरोजपूर - हजूर साहिब नांदेड एक्सप्रेस ही नवीन साप्ताहिक एक्सप्रेस रेल्वे दि.१३ जून पासून सुरू करण्यात येत आहे.दर शुक्रवारी फिरोजपुर हून प्रस्थान करील. हीच रेल्वे दर रविवारी परतीचा प्रवास करील. दि. १५ जून रोजी हजूर साहिब येथून दुपारी ११:५० वाजता प्रस्थान करुन फिरोजपूर(पंजाब) कडे पहिला प्रवास प्रारंभ करील. या नवीन रेल्वेद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठवाड्याला विकासाची नवी भेट दिली आहे . अशा शब्दात खा. डॉ. अजित गोपछडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री स. रवनीत सिंघ बिट्टू यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली रेल्वे मंत्रालयाच्या वतीने फिरोजपुर हुजूर साहेब नांदेड नवीन साप्ताहिक रेल्वे दि. १३ जून २०२५ पासून सुरु करण्यात येत आहे. याबाबत खा. डॉ . अजित गोपछडे यांनी आपली प्रतिक्रिया माध्यमाकडे व्यक्त केली .ते म्हणाले की , या नव्या ट्रेनमुळे महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यातील कनेक्टिव्हिटी वाढेल व विकासाला नवे प्रोत्साहन मिळणार आहे. दोन्ही राज्यातील प्रमुख धार्मिक स्थळांना जोडणाऱ्या या नव्या साप्ताहिक ट्रेनला मंजुरी मिळाल्यामुळे धार्मिक पर्यटनाला



चालना मिळणार असून महाराष्ट्रातील सर्व प्रवाशांना दिल्ली व पंजाबकडे जाण्यासाठी एक नवी ट्रेन उपलब्ध झाली आहे. तसेच, सैन्य दलातील जवानांना देशाच्या सीमेपर्यंत थेट पोहोचण्यासाठी या ट्रेनचा उपयोग होईल. या ट्रेन च्या मार्गावरील संबंधित क्षेत्राला आर्थिक लाभही मिळणार आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, प्रवाशांच्या वाढत्या गर्दीचा विचार करता खा. डॉ. अजित गोपछडे यांनी दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी पंजाब आणि पटनासाहिबसाठी साप्ताहिक ट्रेनची मागणी रेल्वे मंत्रालयाकडे केली होती. याची दखल घेऊन केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे राज्य मंत्री स. रवनीत सिंघ बिट्टू यांनी विशेष लक्ष देऊन ही मागणी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

फिरोजपूर हजूर साहिब साप्ताहिक एक्सप्रेस ही नवीन रेल्वे दर शुक्रवारी फिरोजपूर जंक्शनहून श्री हजूर साहिबसाठी रवाना होईल. ही ट्रेन सुमारे २००० किलोमीटरचा प्रवास सुमारे ३८ तासांत पूर्ण करेल. ही ट्रेन फिरोजपुर कैन्ट येथून दुपारी १३:२५ वाजता प्रस्थान करुन पुढे फरिदकोट, भटिंडा जं, जाखल जं, जींद जं, रोहतक जं, दिल्ली सफदरजंग, फरिदाबाद, पलवल, मथुरा जं, आग्रा कैन्ट, ग्वाल्हेर जं, वीरांगना लक्ष्मीबाई झांसी, बीना जं, विदिशा, भोपाळ, इटारसी जं, खंडवा जं, मनमाड जं, छत्रपती संभाजीनगर, जालना, सेलु, परभणी, पूर्णा अशा प्रमुख स्थानकांवर थांबेल. पहाटे ३:३० वाजता हजूर साहिब नांदेड येथे आगमन होईल.

ही नवीन रेल्वे सेवा पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांतील अनेक महत्त्वाच्या धार्मिक केंद्रांना जोडून संपर्क मजबूत करेल. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे राज्यमंत्री स. रवनीत सिंघ बिट्टू यांचे राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी विशेष आभार मानले आहेत.



**माहुर- भारतीय जनता पक्षाचे आधारवड तथा लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांची पुण्यतिथी मंगळवार ०३ जून रोजी माहूर तालुका भाजपसह इतर राजकीय पक्ष तसेच ओबीसी समाजातील नागरिक व तमाम माहूरकरांच्यावतीने दत्त चौक (टी-पॉईंट) येथे लोकनायकास विनम्र अभिवादन करण्यात आले.**

**नगरपरिषद खुलताबाद जि.छ. संभाजीनगर**
दुरध्वनीक्र:०२४८३-२२१२२५ फॅक्स : ०२४८३-२२१२२५
Email Id :khultabadcomc@gmail.com पिन :४३११०१
२०२५-२६ /जा.क्र./ १२००    दिनांक : ००/००/२०२५

**दरपत्रक सूचना**

नगर परिषद खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर कार्यालय अंतर्गत खालीलनुमार दरपत्रके मागविण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम रु | कोरे निविदा रु | शेरा | मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | खुलताबाद नगरपरिषद करिता MS जलवाहिनी दुरुस्ती करणे. | १०००/- | ५००/- | तिसरी वेळ | Online : mahatenders.gov.in |
| २. | पाणीपुरवठा पंप विविध साहित्य पुरवठा करणे व दुरुस्ती करणे. | १०००/- | ५००/- | द्वितीय वेळ | |
| २. | खुलताबाद शहरात टँकरने पाणीपुरवठा करणे. | १०००/- | ५००/- | द्वितीय वेळ | Offline : नगरपरिषद कार्यालय |
| २. | विद्युत विभाग करिता विविध साहित्य पुरवठा करणे. | १०००/- | ५००/- | प्रथम वेळ | |

उपरोक्त कामे क्र. ०१ व ०२ सविस्तर तपशिल www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १८.०६.२०२५. रोजी पर्यंत उपलब्ध आहे. शुद्धिपत्रक व इतर तपशिल इ. संकेतस्थळावरच देण्यात येतील. तसेच कामे क्र. ०३ व ०४ तपशील हे नगरपरिषद कार्यालयात दि. १८.०६.२०२५ रोजी पर्यंत सादर करावेत, करिता कळविण्यात येते.

(स्वाक्षरीत)
मुख्याधिकारी
नगरपरिषद खुलताबाद

## अग्रलेख...

# मन को जोगी सब करै..!

**तन को जोगी सभी करै, मन को करे न कोय ।**
**सहजै सब सिधि पाइये, जो मन जोगी होय ॥**

तथाकथित साधू किंवा सज्जन आपल्या शरीराचे बाह्य रूप बदलतात. साधू रुद्राक्षांच्या माळा घालतात, भस्माचे पट्टे ओढतात. तथाकथित सज्जन पांढरे स्वच्छ कपडे घालून आपले मन, आपले चारित्र्य किती स्वच्छ आहे, किती निष्कलंक, जोग्यासारखे आहे हे भासवतात. हे सगळे बाहेरूनच असते. पण मनाचे काय, मनाला स्वच्छ करण्याच्या बाबतीत मात्र हे सारे 'तथाकथित'च असतात. असे काहीतरी करा, मनातला भक्तिभाव जागवा म्हणजे मनही शरीरासारखेच स्वच्छ, सुंदर आणि जोगी होईल.

आपल्या दोह्यांमधून अशाप्रकारे समाजाला दिशा दाखवणारे हे आहेत संत कबीर. हिंदी भाषेतीलच नाही तर 'जगातील सर्वश्रेष्ठ व्यंगकार' असे या संत कबीरांना हिंदीवाले मानतात. आपल्या ज्ञानेश्वर, तुकारामांच्या अभंगांचे जे स्थान महाराष्ट्रात आहे तेच स्थान कबीरांच्या दोह्यांचे संपूर्ण उत्तर भारतात, हिंदी भाषकांमध्ये आहे, तेही पंधराव्या शतकापासून. 'व्यंगकार' हा शब्द हिंदीत समाजातील व्यंगांवर टीका करणारा या अर्थाने आहे. समाजातील अनिष्ट चालीरीती, परंपरा, प्रथा, अंधश्रद्धा या साऱ्यांवरच शब्दांचे आसूड कबीरांनी ओढले आहेत. हिंदी भाषेत डॉक्टरेटच्या सर्वाधिक प्रबंधांचा विषय 'संत कबीर' हाच असून, आजही त्यांच्यावरचे किंवा त्यांचे लिखाण, ताजे टवटवीत असल्यासारखे तेवढ्याच उत्सुकतेने, श्रद्धेने वाचले जाते.

मध्ययुगातील भारतीय संत परंपरेत संत कबीरांचे स्थान अनन्यसाधारण आहे. 'कबीराचे दोहे' हे पंधराव्या शतकापासून भारतीय समाज जीवनावर प्रभाव टाकतात. संत कबीरांनी अनेकांच्या आध्यात्मिक, भौतिक, सामाजिक जीवनाला दिशा दिली. त्यामुळेच रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेकांनी कबीरांना वैचारिक गुरू मानले. रवींद्रनाथांनी कबीरांच्या दोह्यांचा इंग्रजीत अनुवाद करून ते जगभर पोचवले. गांधीजींच्या विचारांचा उगम कबीरांच्या संस्कारांमध्ये सापडतो. डॉ. आंबेडकरांनीही त्यांना आपले गुरू मानले होते.

संत कबीरांच्या जन्माबाबत अनेक दंतकथा आणि लोककथा आहेत. काहींच्या मते, कबीर एका विधवेच्या पोटी जन्माला आले. जननिंदेच्या भीतीने तिने त्या बालकास तळ्याकाठी सोडून दिले. तळ्याकाठचे हे बालक निरू व निमा या मुस्लिम विणकर दाम्पत्याला सापडले व पुढे त्यांनी त्याला वाढविले, सांभाळ केला. बहुसंख्य कबीरपंथी विक्रम संवत १४५५ (इ. स. १३९८) मध्ये ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा म्हणजे वटपौर्णिमेच्या दिवशी कबीरांचा जन्म झाला असे मानतात. याच, म्हणजे आजच्याच दिवशी ज्येष्ठ पौर्णिमेस कबीर जयंती साजरी करतात. कबीरांच्या कालखंडात समाज जीवनात प्रत्येक पातळीवर भेदभाव होत असे. गोरगरीब तसेच वंचित वर्गातील लोकांच्या लेकरांना शिक्षणाची दारे उघडली जात नसत. कबीर तर 'निरू-निमा' सारख्या मुस्लिम विणकरांच्या घरात वाढत होते. साहजिकच त्यांना तत्कालीन औपचारिक शिक्षणापासून दूर राहावे लागले. तथापि, समाज जीवनाचे सखोल निरीक्षण, अनुभव व बहुश्रुततेच्या आधारे लौकिकार्थाने निरक्षर असणाऱ्या कबीरांनी सर्व समाजाला अध्यात्म, बंधुता व माणुसकीचा मार्ग दाखवला. आपल्या शिक्षणाविषयी सांगताना कबीर एका दोह्यात म्हणतात,

**मसि कागद छुयो नहीं, कलम गहि नहीं हाथ ।**
**चार ही युग की महातम, मुखहि जनाई बात ॥**

मी शाई वा कागदाला कधी स्पर्शही केला नाही, कधी लेखणी हातात धरली नाही. पण चारही युगातील ज्ञान मी केवळ ऐकून प्राप्त केले, असा याचा अर्थ.

लिहिता वाचता येत नसले तरी कबीरांनी अनुभवातून आणि सत्संगातून ज्ञान प्राप्त केले होते. दोहे, साखी या माध्यमांतून ते आपले विचार बोलून दाखवत आणि त्यांचे शिष्य ते लिहून ठेवत. त्यांचे हे विचार बानी, वचन, आदेश या नावाने ओळखले जातात. कबीरांचे शिष्य भगवानदास यांनी कबीरांच्या ६०० पदांचा संग्रह केला. तो 'बीजक' म्हणून ओळखला जातो. कबीरपंथीय 'बीजक' हा आपला धर्मग्रंथ मानतात. 'कबीर ग्रंथावली' हा देखील एक महत्त्वपूर्ण ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात कबीरांचे ४०० दोहे व ८०० साख्या व इतर पदे आहेत. कबीरांच्या रचना पूरबी हिंदी या बोलीभाषेत आहेत. या भाषेत अवधी, ब्रज, भोजपुरी, खडीवाले, अरबी, फारसी अशा तत्कालीन सर्व भाषांमधील शब्द मोठ्या प्रमाणात आढळतात. या भाषेला 'सुधुक्कडी' असेही म्हटले जाते. कबीरांच्या अनेक रचनांचा 'श्री गुरुग्रंथ साहिब'मध्ये समावेश करण्यात आला आहे.

स्वामी रामानंद हे काशी क्षेत्रातील कबीरांचे समकालीन महान सत्पुरुष होते. त्यांच्याकडे अनेक जाती-धर्मांतील लोक जात येत असत. ते सर्वांना वेद, उपनिषदे, शास्त्रे इत्यादींच्या आधारे मार्गदर्शन करत. त्यांनीही अनेक रचनांची निर्मिती केली आहे. त्यांच्याही अनेक रचनांचा समावेश 'गुरुग्रंथ साहिब'मध्ये आहे. कबीरांचे स्वामी रामानंद यांच्याकडे जाणे-येणे असे. त्यांच्याकडूनच कबीरांना गंगाघाटावर रामनामाची दीक्षा मिळाली असे मानतात. आयुष्याच्या प्रारंभी कबीरांना मुल्ला, मौलवींबरोबर संघर्ष करावा लागला.

हा संघर्ष वैचारिक स्वरूपाचा होता. या संघर्षामुळे कबीरांचे चरित्र अद्भुतरम्य झालेले दिसते. स्वतः मुसलमान समाजात जन्मले असूनही कबीर रामाचे नामस्मरण करतात आणि हिंदूंच्या देव-देवतांची पूजाअर्चा करतात. ते मुसलमानांमधील अनिष्ट रूढी, धार्मिक कट्टरतावादी परंपरा, अत्याचारांवर कडाडून टीका करतात म्हणून मुसलमान मुल्ला, मौलवींनी त्यांना विरोध केला. विविध संकटांतून बाहेर पडल्यानंतर कबीर, 'मी काहीही केले नाही. काही करूही शकणार नाही. जे काही केले, जे काही घडले, ते प्रभू परमात्म्याने केले. पण लोकात मात्र कबीराचे नाव झाले', अशा अर्थाच्या एका दोह्यात लिहितात,

**कबीर ना हमा किआ न करहिगे, ना करि सके सरीरू ।**
**किआ आनऊ किछु हरि कोआ, भइओ कबीरू कबीरू ॥**

कबीरांचा काळ, पंधरावे शतक हिंदू आणि इस्लाम या दोन धर्मांमधील संघर्षाचे होते. या दोन्ही धर्मांमधील अर्थहीन रूढी आणि कर्मकांडांवर टीका, प्रहार करताना त्यांनी कोणालाही सोडले नाही. आज अनेक सुधारणावादी, कथित समाजसुधारक, अंधश्रद्धाविरोधी अनिष्ट बाबींना लक्ष्य करताना मुस्लिमांना सोडून देण्याचा उद्योग करतात. पण कबीरांचे तसे नव्हते. ते दोन्ही धर्मांतील चुकीच्या पायंड्यांना सारखेच झोडपे लगावत. कबीरांनी आपल्या महानतेचा कधी बडेजाव केला नाही आणि लोकांच्या मनात त्यांच्याप्रति असलेल्या आदराचा 'जास्तीचे मिळवण्याकरता परवाना' म्हणून कधी पाहिले नाही. त्यांच्या दैनंदिन जीवनात वेगळे, उठून दिसेल असे काहीही नव्हते. कबीर म्हणजे 'असामान्यपणे सामान्य माणूस' असे ख्यातनाम हिंदी साहित्यिक हजारीप्रसाद द्विवेदी यांनी म्हटले आहे, ते उगीच नाही. त्यांचा साधेपणा त्यांच्याच या ओळीतून कसा व्यक्त होतो पाहा,

**साईं ऐता दीजिए, जाने कुटुम समाय ।**
**मैं भी भूखा न रहू, साधु न भूखा जाय ॥**

जसे आपले बहुतेक संत कवीही होते तसेच कबीरांचेही होते. या साऱ्या संतांनी आपल्यामधल्या कवीच्या, काव्यगुणांच्या भरवशावरच आपल्या समकालीन समाजमनाला हात घातला. एवढेच नव्हे तर ते सारे आजही त्याच प्रभावीपणे समाजमन ढवळून काढू शकतात आणि तसा अनुभव आज पाच-सातशे वर्षांनंतरही आपण घेत आहोतच. कबीरांच्या भक्तिमार्गाचा केंद्रबिंदू राम आहे. 'हा राम' म्हणजे विष्णूचा अवतार किंवा अयोध्येचा राजा नाही. तर तो त्यांचा सर्वांत जवळचा 'आल्हाददायक व चित्तशामक' या अर्थाचा राम आहे. वैश्विक सद्भावाला दिलेले ते एक नाव आहे 'राम'. जे फुलाच्या सुगंधासारखे आहे, ज्याचा अनुभव तर घेता येतो, तरी तो अदृश्य असतो तो राम..!


## विशेष

# क्षमतासिद्धी, मनोबलवृद्धी साधणारा पूल!

### प्रा. सुखदेव बखळे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काश्मीरमधील चिनाब रेल्वे पुलाच्या उद्घाटनासाठी विनाकारण सहा जूनची निवड केली नाही. सहा जून रोजी 'ऑपरेशन सिंदूर'ला एक महिना पूर्ण होत होता. हा जसा जगातील सर्वांत उंचीवरचा पूल आहे, तसाच चीन आणि पाकिस्तानला मिरच्या झोंबवणारा आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानच्या दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त करण्यात आले. त्याचबरोबर 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी चिनी क्षेपणास्त्रे आणि अन्य युद्धसामुग्रीचे पितळ भारतापुढे उघडे पडल्यामुळे चिनाब पुलाच्या उद्घाटनाची घोषणा ही पाकिस्तानच्या अजेंड्याच्या अपयशाची घोषणा आहे आणि म्हणूनच पंतप्रधान पुलावर तिरंगा फडकावत होते, तेव्हा पाकिस्तानने पोसलेली 'पासबान-ए-हुर्रियत' नावाची फुटीरतावादी संघटना पंतप्रधान मोदींच्या जम्मू-काश्मीर भेटीचा निषेध करत होती. काश्मीरमध्ये रेल्वे आणण्याची कल्पना एक शतकाहून अधिक जुनी आहे; परंतु ती २००२ मध्ये गांभीर्याने घेण्यात आली आणि तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ती राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित केली. तीही पाकिस्तानच्या कृतींना उत्तर देण्यासाठी; कारण १९९९ मध्ये कारगिल युद्धादरम्यान काश्मीर खोऱ्यासाठी रेल्वेजोडणीची तीव्र गरज भासली होती. काश्मीरमध्ये रेल्वे आणण्याच्या मार्गातील सर्वांत मोठा अडथळा म्हणजे चिनाब नदी आणि तो ओलांडण्यासाठी रियासी जिल्ह्यातील कौडी आणि बक्कलदरम्यान चिनाब नदीवर जगातील सर्वांत उंच रेल्वे पूल बांधण्यात आला आहे.

१३१५ मीटर लांबीचा चिनाब पूल हा स्टील आणि काँक्रीटचा बनलेला एक कमानी पूल आहे. ताशी २६० किलोमीटर वेगाने वारा वाहत असला, तरी तो सहन करण्याची क्षमता या पुलामध्ये आहे. सर्वांत जास्त तीव्रतेच्या भूकंपाच्या शक्तींना तोंड देण्यासाठी तो डिझाईन केला आहे. चिनाब नदीवरील या विशाल पुलाच्या बांधकामासाठी सुमारे १२ लाख घनमीटर मातीचे उत्खनन करण्यात आले. १३१५ मीटर लांबीच्या चिनाब रेल्वे पुलाच्या बांधकामात सुमारे ३०,३५० टन स्टीलचा वापर करण्यात आला. विशाल कमानीच्या बांधकामात किमान १०,६२० टन स्टीलचा वापर करण्यात आला, तर पुलाच्या डेकच्या बांधकामात १४,५०४ टन स्टीलचा वापर करण्यात आला. याशिवाय कटराजवळील चिनाबची उपनदी असलेल्या अंजी खाडीवर केबल स्टेड पूल बांधण्यात आला आहे. हे दोन्ही भारतीय अभियांत्रिकीचे चमत्कार आहेत. मोदी यांनी प्रतिष्ठित चिनाब रेल्वे पुलावर तिरंगा ध्वज फडकवण्याचा उत्सव साजरा केला. तो एक प्रचंड राष्ट्रीय अभिमानाचा क्षण असल्याचे आणि सर्वांत आव्हानात्मक ठिकाणी अत्याधुनिक पायाभूत सुविधा



उभारण्याच्या भारताच्या वाढत्या क्षमतेचे साक्षीदार असल्याचे म्हटले. हा पूल महत्त्वाकांक्षा आणि अंमलबजावणीचे मिश्रण आहे. ही एक अभिमानाची बाब आहे. ती सर्वांत आव्हानात्मक ठिकाणी अत्याधुनिक पायाभूत सुविधा उभारण्याची भारताची वाढती क्षमता दर्शवते.

एके काळी फक्त एक शाही स्वप्न असलेला काश्मीर रेल्वे प्रकल्प आता राष्ट्रीय एकात्मता आणि अभियांत्रिकी उत्कृष्टतेचे प्रतीक बनला आहे. हा पूल काश्मीरचे भारताशी एकीकरणाचे प्रतीक असून काश्मीरचे लोक ज्या प्रकारे त्याची वाट पाहत होते, ते काश्मीर मुद्यावर भारताच्या विजयाचे प्रतीक म्हटले जाईल. हा महत्त्वाकांक्षी भारतीय रेल्वे प्रकल्प चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांसाठी मोठा धक्का आहे. चिनाब पूल पूर्ण झाल्यामुळे पीर पंजाल प्रदेशातील दुर्गम भागात सामान्य लोक आणि सुरक्षा दलांची ये-जा वाढेल. त्यामुळे या भागातील दहशतवादी आणि फुटीरतावादी परिसंस्थेचे नुकसान होईल. आता, अखंड रेल्वे कनेक्टिव्हिटीमुळे, सुरक्षा दलांची हालचाल आणि त्यांच्या उपकरणांचा पुरवठा केवळ काश्मीर खोऱ्यात नियंत्रण रेषेपर्यंतच नाही, तर लडाख प्रांतातदेखील होईल. भविष्यात हा रेल्वे प्रकल्प कारगिलमार्गे लेहला जाईल, असा विश्वास आहे. याशिवाय, हिमाचलमधून लडाखसाठी रेल्वे मार्ग टाकण्याच्या योजनेवरही काम सुरू आहे. त्यामुळे चीनची चिंता वाढली आहे. या प्रकल्पाने रेल्वेच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबतीत भारताला जगातील आघाडीच्या देशांमध्ये स्थान दिले आहे. ते एकप्रकारे आशियातील चीनच्या वर्चस्वासाठीही आव्हान आहे. हा पूल भारताच्या लवचीकतेचे, विकासाचे आणि सक्षमीकरणाचे प्रतीक आहे. या प्रकल्पामुळे काश्मीर खोरे आणि जम्मूतील दुर्गम भागात विकास आणि पर्यटनाला चालना मिळेल. स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील आणि ते पाकिस्तानी जिहादी अजेंड्यापासून दूर राहतील.

हा प्रकल्प काश्मीरचे भारताशी एकीकरण मजबूत करतो, काश्मीरमधील फुटीरतावाद आणि दहशतवादाचा अजेंडा हाणून पाडतो. म्हणूनच पंतप्रधान चिनाब पुलावर तिरंगा फडकावत होते, तेव्हा ते पाकिस्तानला त्याच्या अपयशाची आठवण करून देत होते आणि चांगला शेजारी म्हणून वागण्याचे आणि भारताशी सौहार्दपूर्ण संबंध निर्माण करण्याचे आणि गरिबी आणि मागासलेपणातून बाहेर पडण्याचे आवाहन करत होते. या पुलाच्या बांधकामामुळे दोन देशांची झोप उडाली आहे. चिनाब पूल जम्मू आणि काश्मीरच्या रियासी जिल्ह्यात चिनाब नदीवर बांधला गेला आहे. तो आयफेल टॉवरपेक्षा उंच आहे. हा पूल उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल लिंक प्रकल्पाचा एक भाग आहे, जो काश्मीरला देशाच्या उर्वरित भागाशी जोडेल. खासियत म्हणजे त्याचे आयुष्य १२० वर्षे असू शकते आणि तो भूकंप, पूर आणि हिमवर्षाव सहन करू शकतो. या पुलाला १७ स्पॅन (खांबांमधील भाग) आहेत. त्यातील सर्वांत मोठी कमान ४६७ मीटर लांब आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेच्या (डीआरडीओ) मदतीने हा पूल स्फोट भारासाठीदेखील डिझाईन करण्यात आला आहे. म्हणजेच ४० किलो किंवा त्याहून अधिक स्फोटके वापरून केल्या गेलेल्या स्फोटाचा या पुलावर कोणताही परिणाम होणार नाही. २० वर्षांच्या कठोर परिश्रमानंतर आणि १,४०० कोटी रुपये खर्चून बांधलेला हा पूल भारताच्या संरक्षण आणि विकासासाठी गेमचेंजर ठरणार आहे. दरम्यान, चीनच्या अस्वस्थतेमागेही अनेक मोठी कारणे आहेत. 'सीपीईसी' हा चीनचा ६२ अब्ज डॉलर्सचा प्रकल्प आहे. तो व्याप्त काश्मीर आणि गिलगिट-बाल्टिस्तानमधून जातो. चिनाब पूल भारताची लष्करी आणि पायाभूत सुविधांची ताकद वाढवेल. ते 'सीपीईसी'साठी एक आव्हान आहे. 'सीपीईसी'ला अगोदरच बलुची बंडखोरांचा विरोध आहे. चीनने व्याप्त काश्मीरमधील डायमिर-भाशा आणि मोहंमद धरण यासारख्या प्रकल्पांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. भारताने यावर आक्षेप घेतला आहे, कारण ते त्याच्या भूभागावर बेकायदेशीर कब्जा करून बांधले जात आहेत. चिनाब पूल भारताला हिंद महासागर आणि दक्षिण आशियामध्ये एक मजबूत स्थान मिळवून देईल. चीन भविष्यातील नौदल तळ म्हणून ग्वादर बंदर विकसित करू इच्छित आहे; परंतु भारताची वाढती ताकद ते कठीण करू शकते. २०२० च्या गलवान संघर्षानंतर भारत आणि चीनमध्ये तणाव निर्माण झाला आहे. चिनाब पूल लडाखमध्ये भारताच्या लष्करी तयारीला गती देईल. तो चीनसाठी एक धोरणात्मक तोटा आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

### विजय निचकवडे

# जलस्रोतांचे प्रदूषण अन् मानसिकता!

विषय जटिल असला की, तो न्यायालयात जातो. पण न्यायालयाच्या निर्णयानंतरही त्याचे पालन तेव्हाच होते, जेव्हा संबंधितांची मानसिकता सकारात्मक असेल. पीओपी गणेश मूर्तींवरील उठविण्यात आलेली बंदी आणि त्यांचे नैसर्गिक जलस्रोतांच्या ठिकाणी विसर्जन न करण्याचे निर्बंध कदाचित याच मानसिकतेला गृहीत धरून असावेत. जे आजपर्यंत आम्ही करू शकलो नाही, ते आता होणार असेल तर नक्कीच आपले जलस्रोत वाचू शकतील. नाहीतरी कुणाचा तरी फायदा अन् निसर्गाचे नुकसान हे अटळ आहे. मानवी स्वभाव आहे. वेळ निघून गेली की, तो सर्व काही सोयीस्कर विसरतो. म्हणूनच तर प्रत्येक वेळी गणेशोत्सव आला की, प्लॅस्टर ऑफ पॅरिस म्हणजेच पीओपी मूर्तींचा विषय ऐरणीवर येतो. मूर्तिकारांचे नुकसान आणि अन्य विषय घेऊन चर्चेत येणारा हा विषय अशा मूर्तींवर बंदी घालण्यापर्यंत गेला. मात्र, त्या विरोधातही याचिका दाखल झाली अन् उच्च न्यायालयाने ही बंदी उठविण्याचा निर्णय घेतला. पीओपीच्या मूर्ती तयार करणे आणि विकणे यावरील बंदी या निर्णयाने उठविली गेली; मात्र नैसर्गिक जलस्रोत म्हणजेच नद्या-तलाव यात पीओपी मूर्तींचे विसर्जन करण्यावर निर्बंध कायम ठेवले आहेत. हेतू एवढाच की, नैसर्गिक जलस्रोत प्रदूषित व्हायला नको. आज आम्ही गंगा स्वच्छतेसाठी कोट्यवधी रुपये खर्च करतो. नदी स्वच्छता अभियान राबवितो. अशावेळी ही बंदी नक्कीच कौतुकास्पद आहे. पण मग बंदी उठविल्यानंतर तयार होणाऱ्या मूर्तींचे विसर्जन होणार कुठे? हा प्रश्न अनुत्तरितच आहे.



उंचच उंच अशा विशालकाय गणपती मूर्तींची निर्मिती केली जाते. अशा मूर्ती या प्रवाहित जलातच विसर्जित करण्याची आमची मानसिकता असते. बरेचदा यात आमच्या भावनाही जोडलेल्या असतात. अशावेळी खरंच नैसर्गिक जलस्रोत प्रदूषणविरहित राहतील का, हा प्रश्न आहे. न्यायालयाचा निर्णय एका बाजूचे समाधान करणारा नक्कीच आहे, पण निसर्गाचे काय? तो न्यायालयात जाऊ शकत नाही. त्याची भिस्त आता राज्य शासनाच्या निर्णयावर आहे. ३० जूनपर्यंत राज्य शासनाने विसर्जनाच्या संदर्भात निर्णय घ्यावा, असे न्यायालयाने सांगितल्याने शासनाची डोकेदुखी नक्कीच वाढली असेल. अशावेळी लोकांची विशेष करून सार्वजनिक गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. नैसर्गिक जलस्रोत पर्यायाने आपल्याच भल्याचे काम करतात. ते अशुद्ध झाल्यास त्याचे दुष्परिणाम आपल्यालाच कालांतराने अनुभवास येतील, असा विचार जेव्हा येईल, तेव्हाच अशा विषयांमध्ये न्यायालयालाही हस्तक्षेप करण्याची वेळ येणार आहे.

आज केवळ पीओपी मूर्तींमुळे नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण होत आहे असे नाही. अनावश्यक असलेले प्लॅस्टिक सातत्याने जमिनीत मुरत असल्याने त्यामुळे निर्माण होणारी प्रदूषणाची समस्या, आमच्या आनंदासाठी समुद्र, नद्यांच्या किनाऱ्यावर फिरायला जाणारे आम्ही सहज प्लॅस्टिक पिशव्या आणि पाण्याच्या बाटल्या नदी-समुद्र किनारी फेकून मोकळे होतो. जे आम्हाला आनंद देतात, त्यांना दुःखात टाकण्याचे काम आमची एक कृती करून जाते. मोठमोठ्या वसाहती निर्माण होतात; मात्र त्यांच्या गटाराच्या पाण्याची विल्हेवाट लावली जात नाही. कुठेतरी मोकळ्या भूखंडावर ते मुरविले जाते आणि भूगर्भातील जल प्रदूषित होते. आमची प्रत्येक कृती ही नैसर्गिक जलस्रोतांसाठी विकृती ठरत आहे. यात बदल व्हावा असे वाटत असेल तर याची सुरुवात आपल्या मानसिकतेत बदल झाल्याशिवाय होणार नाही. न्यायालय निर्णय देईल, राज्य शासन नियमावली ठरवून देईलही; परंतु आमच्या स्वभावगुणानुसार जर आम्हाला निसर्गाशी काय घेणे-देणे, मनाला वाटेल तेच करू, अशी जर आमची भूमिका राहणार असेल तर नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण कदापिही थांबू शकणार नाही. आज पीओपी मूर्तींवरील बंदी उठवली. हा निर्णय मूर्तिकारांसाठी दिलासा देणारा आहे, पण दुसरीकडे त्यांच्या विसर्जनाचा प्रश्न मोठी परीक्षा राज्य शासनासाठी राहणार आहे. कृत्रिम तलावांची निर्मिती आणि त्यात विसर्जन हे जर लोकांच्या गळी उतरले नाही तर नदी-तलावांमध्ये तरंगणाऱ्या पीओपी मूर्ती पाहण्याचा योग यावेळी नक्की असेल!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# पंचकोशातील अन्नमय कोश!

### प्रा. दिलीप जोशी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे पंचकोश विकासाला प्राधान्य देणारे आहे. तैत्तिरीय उपनिषदात शिक्षावल्लीमध्ये महर्षी वरुण आणि भृगू ऋषी संवाद आहे. त्यात पंचकोश विकास सांगून भारतीय शिक्षणाचे ध्येय स्पष्ट केले आहे. म्हणजे भारतीय शैक्षणिक विचारात व्यक्तिमत्त्व विकासात पंचकोश विकास सांगितला आहे. दुर्दैवाने पंचकोश आजवर धूसरच राहिला. मोजकी काही शिक्षण क्षेत्रातील मंडळी सोडली तर सर्वसामान्यांसाठी हा विषय नवीनच असावा. म्हणून हा विषय सोप्या भाषेत समजावून घेऊ. पंचकोशाचा उल्लेख तैत्तिरीय उपनिषद, शांकरभाष्य आणि विवेकचुडामणीमध्ये आला आहे. म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानात पंचकोश विकास पुरातन कालावधीपासून सांगितला आहे.

पंचकोश म्हणजे पाच प्रकारचे कोश हे सहज समजते- १) अन्नमय कोश, २) प्राणमय कोश, ३) मनोमय कोश, ४) विज्ञानमय कोश आणि ५) आनंदमय कोश हे ते पाच कोश आहेत. आज आपण अन्नमय कोशाचा विचार करू.

'अन्नमय' या शब्दावरून येथे अन्नपदार्थाचा संबंध असेल हा प्राथमिक अंदाज सर्वांना येईलच. कोश म्हणजे आवरण. रेशीम कीडा स्वत: लाळेच्या साह्याने स्वतःभोवती रेशमाचा कोसला तयार करतो. त्या आवरणाला कोश म्हणतात. म्हणजे 'पंचकोश' याचा अर्थ पाच आवरणे हे सामान्य भाषेत लक्षात येईल. आपला विचार केला तर जन्माला आलेल्या जिवाभोवती असलेली आवरणे म्हणजे कोश. अशी पाच आवरणे आपल्याभोवती आहेत. मनुष्य योनीचा विचार केला तर आपल्याभोवती आवरणे म्हणजे जो आपला पिंड आहे त्याच्या भोवती पाच आवरणे म्हणजे कोश आहेत. अजून सोपे म्हणजे आपल्या आत्म्याभोवतीचे कोश असा अंदाज करायला हरकत नाही.

कल्पना करायची असेल तर समजा एक मोती किंवा हिरा आहे. त्याला एका छोट्या पेटीत ठेवले तर तो झाला आनंदमय कोश. ही पेटी त्यापेक्षा थोड्या मोठ्या पेटीत ठेवली तर ही पेटी म्हणजे विज्ञानमय कोश. ही पेटी अजून एका पेटीत ठेवली तर ती पेटी म्हणजे मनोमय कोश. याही पेटीला अजून एका पेटीत ठेवले तर ती सर्वांत बाहेरची पेटी म्हणजे अन्नमय कोश. सर्वांत बाहेरची पेटी आपणास दिसते. इतर पेट्या आत असून हिऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी प्रथम पेटीपासून त्या एकेक उघडाव्या लागतील. तेव्हा कुठे त्या हिऱ्यापर्यंत पोहोचता येईल. इथे या पाच पेट्या म्हणजे पाच आवरण म्हणजे पाच कोश आहेत. पेटी जशी एक उघडली तरच दुसरी उघडते. पंचकोशही असाच एकमेकांवर अवलंबून असतो.

अजून एक उदाहरण घेऊ; कमळाचे फूल हळूहळू उमलते. उमलत असताना ते बाहेरून उकलत आत आत उकलत जाते. याला विकासात्मक उकल (प्रोग्रेसिव्ह अन्‌फोल्डमेंट) म्हणतात. पंचकोश विकास असाच उमलत जातो. या सर्व पाकळ्या परिपूर्ण उकलल्या; त्यांची एकत्रित उकल आपण डोळ्यांनी पाहतो तेव्हा ते कमळ सर्वांगीण सुंदर दिसते. कधी कधी यातील सर्वच पाकळ्यांची उकल होतेच असे नाही. अन्नमय कोशाचा विचार करताना पेटी आणि कमळ दोन्ही उदाहरणे लक्षात घ्यावी लागतील. पंचकोशात पहिला अन्नमय कोश जो आत्म्यापासून पाचवा पण आपल्यासाठी सर्वांत पहिला कोश आहे. अन्नमय कोशातील अन्नाचा प्रथम विचार केला तर... अन्न म्हटले की आपल्या डोळ्यासमोर येते ते खाद्यपदार्थ, जेवणाचे ताट, वरण, भात, भाजी, पोळी, पाणी, दूध, फळे असे शेकडो प्रकारचे खाद्यपदार्थ. आपण जेव्हा कोणताही पदार्थ खाण्यासाठी बसतो तेव्हा ताटातील पदार्थ आपल्या समोर ताटात असतात आणि ग्रहण करणारा मी वेगळ्या पाटावर बसलेला आहे. इथे अन्न वेगळे आणि मी वेगळा आहे, पण जसा मी तो पदार्थ घास म्हणून तोंडात घेतो, त्याला चावतो आणि तो पदार्थ अन्ननलिकेमार्फत पोटात जातो. चयापचय होऊन तो पदार्थ शरीराचा भाग बनतो. मी आणि अन्न वेगळे नाहीच. 'जळ जैसे जळी वेगळे न दिसे.' पाण्यात पाणी टाकले तर ते जसे एकरूप होते तसेच अन्नपदार्थाने शरीराचे रूप धारण करणे होय. अजून सोपा विचार म्हणजे अन्नपदार्थाचा अंतिम परिपाक म्हणजे आपले स्थूल शरीर. हे स्थूल शरीर म्हणजे अन्नमय कोश होय. थोडक्यात आपले शरीर म्हणजे अन्नमय कोश होय. सोप्या भाषेत सांगायचे तर आपण नोकरीवर जातो म्हणजे अन्नमय कोश नोकरीवर जातो, प्रवास करतो अन्नमय कोश, दृश्य स्वरूपात दिसणारे आपले शरीर ज्याला स्थूलदेह म्हणतात तो आपला अन्नमय कोश सर्व वर्तन करीत असतो.

सध्या अजून एक गोष्ट लक्षात ठेवू की, या अन्नमय कोशात म्हणजे शरीरात असणारी ऊर्जा म्हणजे अन्नमय कोश नाही. उदा. जेव्हा एखादी व्यक्ती मरण पावते म्हणजे तिच्या शरीरातील प्राण जिला ऊर्जा म्हणू ती नष्ट होते. पण त्याचे मृत शरीर कायम असते. म्हणजे त्याचा अन्नमय कोश मृतावस्थेत असतो.

अजून लक्षात घेऊ; आईच्या पोटात गर्भधारणा होताच आईने खाल्लेल्या पदार्थापासून आपला अन्नमय कोश तयार होतो. मग मूल जन्माला येते. जेव्हा आपण जन्म घेतो तेव्हा आपले शरीर विशिष्ट किलो ग्रॅमचे असते. मग वयोमानानुसार पुढे ते वजन किलो किलोने वाढत जाते. म्हणजे ग्रहण केलेले अन्नपदार्थ अन्नमय कोशात रूपांतरित होतात म्हणजे अन्नपदार्थ शरीरामध्ये रूपांतरित होतात. शरीर हे पंचतत्त्वाचे बनलेले आहे म्हणजे आपण खाल्लेले अन्न पंचतत्त्वाशी तादात्म्य पावते. अजून एक, मन-बुद्धी-चित्त हे अन्नमय कोशाशी संबंधित असू शकतात. बऱ्याचदा त्यांचा परिणाम अन्नमय कोशावर होतो; असे असले, तरी मन-बुद्धी-चित्त हे त्याचा भाग नाही. एखादा मतिमंद किंवा गतिमंद मुलगा असेल तरी त्याचे शरीर धष्टपुष्ट असते. म्हणजे त्याचा अन्नमय कोश पुष्ट आहे. त्याचे इतर कोश विकसित असतीलच असे नाही. पण इतर कोशांच्या विकासाचे प्रमुख स्थान अन्नमय कोश आहे. अन्नमय कोश हा इतर कोशांना पूरक आहे हे जरी खरे असले, तरी 'शरीर सशक्त तर मन सशक्त' हे कायम सत्य नाही. शरीराला म्हणजे अन्नमय कोश हा खलुधर्म साधन आपण मानतो, हे लक्षात घेतले पाहिजे. सर्वांगीण विकास म्हणजे सर्व कोशांचा विकास होय. त्यांचा सहसंबंध असतो हा संकेत आहे, नियम नाही. पाचही कोशाचा समतोल विकास म्हणजे सर्वांगीण विकास होय. त्यात अन्नमय कोश हा प्रथम कोश असल्यामुळे त्याचा विकास महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी आहार आणि पूरक बाबींचा विचार महत्त्वाचा आहे. अन्नमय कोश पुष्ट होण्यासाठी शारीरिक साक्षरता महत्त्वाची आहे. म्हणजे केवळ आहारच महत्त्वाचा नाही तर व्यायाम आणि झोप याचाही विचार अन्नमय कोश पुष्ट होण्यासाठी गरजेचे आहे. शरीराची सुदृढता केवळ सकस अन्न मिळाल्याने होत नाही तर दैनंदिन शारीरिक हालचाली, खेळ, व्यायामही करावा लागेल. केवळ सकस अन्न आणि भरपूर व्यायाम केला, पण निद्रानाश असेल तरीही न्यूनता आहे. अन्नमय कोश जीवनाचे आद्य खलुधर्म साधन आहे. म्हणून त्याचा शास्त्रीय अभ्यास व्हावा.

९८२२२६२७३५

## येणार, येणार म्हणता 'ती' आलीच नाही

नुकतीच वरील शीर्षकाची एक बातमी वाचण्यात आली. सर्व गावकरी तिच्या स्वागतासाठी हार-तुरे घेऊन सज्ज होते. परंतु ती आलीच नाही. किती हिरमोड झाला असेल? कल्पना करू शकत नाही असे बरेच प्रसंग आपल्या वैयक्तिक जीवनात सुद्धा येत असतात. परंतु हा प्रसंग कोणा वैयक्तिक जीवनात नसून संपूर्ण साखरखेर्डावासीयांच्या मनातला आहे. काय बरे वाटले असेल त्यांना?

त्याचे झाले असे की पिंपरी-चिंचवड ते साखरखेर्ड अशी बस सुरू करण्याची बरेच दिवसांची मागणी पूर्ण होऊ लागली होती. मागणी करणाऱ्याच्या हातात तसे आदेशही आले होते आणि ५ जूनला या बसचे साखरखेर्डा येथे आगमन होणार होते. त्यासाठी संपूर्ण साखरखेर्डावासी यांनी तिच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केली होती परंतु बस आलीच नाही. आज साखरखेर्डा हे एक ऐतिहासिक गाव आहे. बुलढाणा जिल्ह्यातील फार मोठी बाजारपेठ आहे. या गावाच्या अंतर्गत जवळपास ५० खेडी आहेत. श्री पलसिद्ध स्वामी महाराजांची समाधी व मठ आहे. त्याचप्रमाणे प्रल्हाद महाराजांचे फार मोठे मंदिर आहे दोन्ही संस्थांच्या भक्तांची दर्शनाच्या निमित्ताने सारखी ये-जा सुरू असते. दोन्ही संस्थांचे फार मोठे उत्सव दरवर्षी येथे होत असतात. तसे पाहता साखरखेर्डा हे गाव सिंदखेडराजा तालुक्यात येत असल्याने कार्यालयीन कामानिमित्त बऱ्याच लोकांना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून उच्च शिक्षणासाठी येथील विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजीनगरला जावे लागते. त्याचप्रमाणे वैद्यकीय उपचाराच्या दृष्टीने सुद्धा बऱ्याच रुग्णांना छ. संभाजीनगर व पुणे येथे जावे लागते.


तसे पाहता आज रोजी परिवहन महामंडळाच्या पूर्व विदर्भातल्या सर्व जिल्ह्यांतून छ. संभाजीनगर, पुणे, मुंबई जाणाऱ्या बसेस चिखली, देऊळगाव राजा मार्गे जातात. त्यातील काही बसेस अमडापूरवरून मंगरूळ, नवघरे, साखरखेर्डा, दुसर बीड मार्गे वळवल्यास आणि मेहकर, चिखली, सिंदखेडराजा या आगारांनी काही बसेस सुरू केल्यास प्रवाशांची गैरसोय दूर होईल आणि विशेष म्हणजे या गावाला चारही दिशांने रस्ते येतात. या रस्त्याने फार मोठी रहदारी सुरू असते. परंतु तुलनेने येथे बसेस फारच कमी येतात. बसेसविषयी कुठे चौकशी सुद्धा करता येत नाही. तेव्हा स्थानिक लोकप्रतिनिधींनी, गावकऱ्यांनी व परिवहन महामंडळाने वेळीच दखल घेऊन सुरक्षिततेच्या दृष्टीने साखरखेर्डा येथे प्रवासी निवारा देऊन चौकशी कक्ष सुरू करण्यात यावा.

**धनंजय पांडे**/९४०४९१७८४७

## वाचक पत्रे

## ट्रेडिंग सॉफ्टवेअरवर बंदी हवी

ट्यूबवर अशी एक बातमी वाचली की एका आध्यात्मिक गुरूंनी अनवधानाने दूरचित्रवाणीवरील मुलाखत देताना एका एआय आधारित सॉफ्टवेअरची माहिती देऊन टाकली. या सॉफ्टवेअरच्या मदतीने शेअर्स, बॉण्ड वगैरेचे ट्रेडिंग अलगोरिदमच्या साहाय्याने आपोआप होत राहते व कुठलीही मेहनत न करता पैसा कमावता येतो. हे जर खरे असेल तर त्यामुळे खूप मोठा अनर्थ होईल. कारण आधीच आपल्या समाजात काम न करता पैसा मिळवण्याची वृत्ती बळावत चालली आहे. गेमिंग ॲप आधीच खूप झाले आहेत. जिच्या जाहिराती तथाकथित सेलेब्रिटीज करत असतात व लोकांना



आळशी बनवण्यात हातभार लावत असतात. त्यात भर म्हणून हे ट्रेडिंग सॉफ्टवेअर जर सहज पैसा मिळवून देऊ लागले तर ते समाजविघातक ठरू शकेल अशी भीती आहे. म्हणूनच सरकारने अशा सॉफ्टवेअर्सवर त्वरित बंदी आणण्याची आवश्यकता आहे.

**रवींद्र पंडित**/८४२४९८४३५०

## गौ, गंगा, गीता रक्षण

गोवा येथे त्रिदिवसीय सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव चैतन्यमय वातावरणात संपन्न झाला. हा महोत्सव म्हणजे धर्मजागृतीचा उद्घोष होता. गाय, गंगा आणि गीता या सनातन संस्कृतीच्या आधारस्तंभांचे रक्षण ही काळाची गरज आहे. याविषयी जागृती महोत्सवातील विविध मार्गदर्शनातून झाली. गौमातेचे रक्षण म्हणजे भारतीय शेती, आरोग्य आणि संस्कृतीचे रक्षण.

गंगा म्हणजे केवळ नदी नव्हे, तर जीवनदायिनी आध्यात्मिक शक्ती. गीता म्हणजे प्रत्येक मानवाच्या जीवनातील मार्गदर्शक ग्रंथ. वैदिक मूल्यांवर आधारित जीवनशैली असल्यास या तिन्हींचे रक्षण नक्कीच होईल. याची जाणीव शंखनाद महोत्सवामुळे झाली.

या महोत्सवातून समाजात धार्मिक आणि राष्ट्रीय कर्तव्यांची जागृती झाली. गौ, गंगा, गीता यांचे रक्षण म्हणजे सनातन राष्ट्राच्या पुनर्स्थापनेचा पाया याची जाणीव झाली. हा महोत्सव म्हणजे सनातन राष्ट्रस्थापनेच्या दिशेने उचललेले दृढ पाऊल आहे.

**रेणुका हरदास**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आई वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा-प.पूज्य प्रदीप मिश्राजी



**तभा वृत्तसेवा**
**चाकरवाडी दि.११ जून**

देव हा देवच आहे, तो लहान किंवा मोठा नसतो, देवाची भक्ती ही भक्तीच असते ती कोणत्याही देवाची असली तरी चालते. नामस्मरणात मानवी जीवनाला सुख मिळत असते. त्यामुळे देवात भेद न करता देवा समान आई-वडिलांची सेवा करा असा मौलिक सल्ला परमपूज्य प्रदीप मिश्राजी यांनी दिला.

चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महा न संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपा आशीर्वादाने व तपो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित शिवपुराण कथेत प्रदीप जी मिश्रा बोलत होते.

## २४ तास महाप्रसाद

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या कृपा आशीर्वादाने व तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराण कथा कार्यक्रमास आलेल्या लाखो भाविक भक्तांना २४ तास महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व भाविक भक्तांना गेली अनेक वर्षे पासून महाप्रसादाची व्यवस्था माऊली दादाच्या कृपा आशीर्वादाने अविरत सुरू आहे.

## करवीर पिठाचे शंकराचार्य यांची चाकरवाडी भेट



दरम्यान मंगळवारी करवीर पिठाचे शंकराचार्य यांनी चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास व प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली भाविक भक्तांना आशिर्वाद दिले.

# श्रीगुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे वैद्यनाथ दर्शन आणि बेलवाडी मंदिरास भेट

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ जून**

श्री१०८ गुरू शंकरलिंग शिवाचार्य महाराज, मठ संस्थान खरोळा (ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर) यांनी मंगळवारी परळी वैजनाथ येथे सदिच्छा भेट दिली. द्वादश ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे त्यांनी दर्शन घेतले.

दर्शनानंतर श्रीगुरु महाराजांनी बेलवाडी येथील श्री संत गुरुलिंग स्वामी मंदिर संस्थान येथे भेट दिली. यावेळी संस्थानचे अध्यक्ष श्री दत्तात्रयआप्पा ईटके गुरुजी यांनी महाराजांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन औपचारिक स्वागत केले व त्यांचे शुभाशीर्वाद घेतले. यावेळी महाराजांनी संत गुरलिंग स्वामी मंदिर बेलवाडी येथे झालेल्या नवीन बांधकामाचे पाहणी करून समाधान व्यक्त केले.



या प्रसंगी समाजातील मान्यवर माजी नगराध्यक्ष सोमनाथआप्पा हालगे, महादेव ईटके, दयानंद स्वामी, विकास हालगे, श्याम बुद्रे, रमेश चौंडे, संजय खाकरे, नितीन समशेटी, सुशील हरंगुळे, प्रकाश खोत, शिवकुमार चौंडे, दत्तात्रय गोपनपाळे, दीपक स्वामी, फुलारी आप्पा, गणेश स्वामी, व योगेश स्वामी यांचा समावेश होता. श्रीगुरु महाराजांच्या आगमनाने परिसरात भक्तिभावाची लहर निर्माण झाली होती.

# परिक्षक व नियामक यांचे पेपर तपासणीचे मानधन तत्काळ द्या

## मराठवाडा शिक्षक संघाची विभागीय सचिव यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ जून**

फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परिक्षेच्या तपासलेल्या उत्तर पत्रिकांचे मानधन तात्काळ देण्यात यावे असी मागणी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय सचिव यांच्याकडे करण्यात आली आहे.



याबाबत मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेच्या उत्तर पत्रिका तपासलेल्या परीक्षक व नियामकांना दिले जाणारे मानधन शिक्षण मंडळाने अद्याप पर्यंत दिले नाही तरी ते त्वरीत देण्यात यावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगरचे सचिव भाई चंद्रकांत चव्हाण व जालण्याचे सचिव संजय येळवंते यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिव यांना प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देऊन केली आहे.

सदरील मागणीकडे दुर्लक्ष केल्यास व वेळकाढूपणाचे धोरण अवलंबविल्यास मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांच्या मार्गदर्शना व नेतृत्वाखाली आपल्या कार्यालयासमोर तिव्र आंदोलन केले जाईल असा इशारा निवेदनात दिला आहे.सदरील निवेदन मंडळाच्या उपसचिव प्रियाराणी पाटील यांनी स्विकारले.

निवेदनावर मराठवाडा शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण, जालना जिल्हा सचिव संजय येळवंते यांच्यासह संघटनेचे ए.एस.ढमढेरे, व्ही.ई.चव्हाण, व्ही.आर.सोलाटे,विनोद केनेकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.असे अघाव यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# पालखी मार्गावरून मोठ्या वाहनांच्या प्रवेशास बंदी घालण्याची शिवसेनेची मागणी

पोलीस निरीक्षक यांना निवेदन देत तातडीने कारवाईची विनंती

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.११ जून**

यंदाच्या आषाढी यात्रेनिमित्त परळी शहरात दाखल होणाऱ्या संतांच्या पालख्या आणि त्यासोबत येणाऱ्या हजारो वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पालखी मार्गावरील वाहतुकीची विशेष व्यवस्था करण्यात यावी, तसेच या मार्गावरून मोठ्या वाहनांच्या (ट्रक, टेम्पो, हायवा इत्यादी) प्रवेशास तात्काळ बंदी घालण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे.

या मागणीसंदर्भातील निवेदन आज शुक्रवार, दिनांक ६ जून रोजी परळी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले. हे निवेदन शिवसेनेचे माजी नगराध्यक्ष आणि पक्षाचे नेते मा. अभयकुमार (पप्पू अण्णा) ठक्कर यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले.



यावेळी शिवसेना युवा नेते प्रा.अतुल दुबे,सामाजिक कार्यकर्ते ड. मनोज संकाये,श्रीनिवास सावजी युवासेना जिल्हा उप प्रमुख मोहन परदेशी, शिवसेना माजी शहर संघटक संजय कुकडे, सुधाकर वाघमारे, कारभारी शिंदे, योगेश जाधव यांच्यासह अनेक शिवसैनिक व नागरिक उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, नगर परिषदेमार्फत संत जगमित्र नागा मंदिर समोरील मार्गावर ‘८ फूटांपेक्षा उंच वाहनांना प्रवेशबंदी’ असे स्पष्टपणे नमूद करून कमान उभारण्यात आली आहे. तरीदेखील मोठ्या वाहनांचा या मार्गावरून वारंवार प्रवास सुरू आहे, ज्यामुळे पालख्या आणि वारकऱ्यांच्या सुरळीत प्रवासात अडथळा निर्माण होत आहे.

शिवसेनेने यावर तात्काळ बंदोबस्त वाढवून वाहतूक नियंत्रणासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली आहे. तसेच, वारकऱ्यांना सुरक्षित, शांततामय व निर्विघ्न मार्ग मिळावा यासाठी पोलिस प्रशासनाने तत्काळ आणि प्रभावी कारवाई करावी, अशी अपेक्षाही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

# साबला येथे नवनियुक्त महिला कर्मचारी यांचा सन्मान सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.११ जून**

केज तालुक्यातील साबला ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने नवनियुक्त पोलिस कॉन्स्टेबल काकडे वैशाली भगिरथ, अंगणवाडी शिक्षिका काकडे शिवकांता अजय, अंगणवाडी मदतनिस मुळे शोभा आमोल यांचा सन्मान सरपंच जनाबाई नरहरी काकडे, उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे, सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ, एआरटी संस्था, यवतमाळ प्रकल्प व्यवस्थापक वली तांबोळी, प्रकल्प सहाय्यक ज्योती सांबरे, प्रदिप दहिरे यांच्या सर्वांच्या उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला.तसेच काकडे वैशाली यांनी गरिब पस्थितीवर मात करून शालेय प्राथमिक, माध्यमिक शिक्षण घेतले. वैशालीच्या मनामध्ये एक जिद्ध आपण आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिले ते वैशालीने पूर्ण करून दाखवले. सत्कार स्विकारत असताना असे म्हटले की गावातील मुलांनी मुलांनी शालेय शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करावी. जर नोकरी नाही लागली तर एखादा उदयोग व्यवसाय निवडावा आणि आई वडिलांचं स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न करावा.

# छत्रपती शिवाजी महाराज व पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा विचार आत्मसात करणे हेच फाऊंडेशनचे उद्दिष्ट-दिपक होळकर

## बोरगाव येथे आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.११ जून**

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हा संकल्प डोळ्यासमोर ठेऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्माउत्सवानिमित्त व शिवराज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य ठेवून बोरगांव बु.येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार शिबिर तसेच कायदेविषयक जनजागृती शिबिर घेण्यात आले.

फाऊंडेशन व अहील्या प्रबोधनी मंच तर्फे करण्यात आले .सदरील शिबिरास उपजिल्हा रुग्णालय केज पंचायत समिती केज यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.मोराळे , डॉ.शेटे ,डॉ.सावंत , डॉ.कुलकर्णी ,डॉ.राऊत औषध निर्माण अधिकारी श्री चाटे यांनी आरोग्य तपासणी केली.कायदेविषयक जनजागृती करताना ड. डी. टी.सपाटे व ड. मिसळे एस. व्ही. यांनी परखड शब्दांत ग्रामस्थांना मार्गदर्शन व नवी दिशा दिली. शिबिरात ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे तपासणी करून औषध उपचार करून घेतले

आरोग्य शिबिरास रामहरी राऊत (कार्याध्यक्ष शिवसेना मदत कक्ष महा.राज्य.) ड.योगेश दिलीप चांगण अध्यक्ष आरंभ फाऊंडेशन व श्री शशिकांत बापू गव्हाणे भारतीय किसान संघ यांचे अमूल्य व मोलाचे मार्गदर्शन लाभले

शिबिर यशस्वीतेसाठी आरंभ फाऊंडेशन चे सचिव व अहिल्या प्रबोधनी मंच चे अध्यक्ष श्री.दिपक रमेश होळकर मंचचे सचिव ड. उत्तरेश्वर बा.निंगुळे, विजय निंगुळे फौजी, अशोक निंगुळे, गोपाळ निंगुळे,जगन्नाथ होळकर ,निलेश निंगुळे,भगवान मामा गाते,लोंढे मामा,बाबासाहेब निंगुळे व्यवस्थापक निखिल मुसळे, पवन बोराडे,गणेश गुरव, दिगंबर निंगुळे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीचे बोरगांव बु.चे पदाधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केले. या आरोग्य शिबिराचे सूत्रसंचलन कु.सायली दिगंबर होळकर व ड श्री उत्तरेश्वर बा.नींगुळे यांनी. सामाजिक उपक्रमाने कार्यक्रम घेण्यात आल्याने सर्वत्र कौतुक केले जात आहे

# निवड व वरिष्ठ वेतन श्रेणी, वैद्यकीय बिले तसेच महागाई भत्त्यासाठी बेमुदत धरणे आंदोलन : कास्ट्राईब

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ जून**

तालुक्यातील शिक्षक कर्मचारी बांधवांचे गेल्या अनेक वर्षापासून जिल्हा परिषद बीड स्तरावर प्रलंबित असलेले निवड व वरिष्ठ वेतन श्रेणी मिळून ३२ प्रस्ताव वैद्यकीय बिले ३९ प्रस्ताव व महागाई भत्त्याच्या संदर्भातील प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याकारणाने महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने शिक्षणाधिकारी(प्रा) यांना गटशिक्षणाधिकारी माजलगाव यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले आहे.गटशिक्षणाधिकारी कार्यालयासमोर नवीन शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्याच दिवसापासून म्हणजे १७ जून पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहेत.

वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनी नियमित सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय करून त्यांचे मूलभूत अधिकार डावलले आहेत.राज्य शासनाच्या नियमानुसार सेवा कालावधीनुसार निवड व वरिष्ठ वेतनश्रेणी बंधनकारक आहे.मात्र अनेक कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव विविध टप्प्यावर प्रलंबित असून,त्याचे निराकरण होत नाही.परिणामी कर्मचारी आर्थिक व मानसिक त्रास सहन करत आहेत.तसेच शासकीय नियमानुसार अधिकृत रुग्णालयामधून केलेले उपचारानंतर सादर केलेली वैद्यकीय बिले मंजूर करणे बंधनकारक असतानाही,महिन्यानंतरही ती मंजूर न होणे ही गंभीर बाब आहे.त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना वैयक्तिक कर्ज काढावे लागत आहे.काही प्रकरणांमध्ये कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या उपचारासाठी वेळेत मदत न मिळाल्याने गंभीर परिणाम झाले आहेत.केंद्र व राज्य शासनाकडून महागाई भत्ता वेळोवेळी जाहीर केला जातो.मात्र संबंधित भत्याची अंमलबजावणी व आदा यामध्ये विलंब होत आहे. शासनाने २०२४ मध्ये महागाई भत्ते बाबत स्पष्ट निर्देश दिले असताना सुद्धा प्रत्यक्ष पातळीवर त्याची अंमलबजावणी करण्यात दिरंगाई व टाळाटाळ होताना दिसून येत आहे. या सर्व प्रकरणाची सोडवणूक व्हावी व दप्तर दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर-कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी या आशयाचे वरिष्ठ पातळीवर बेमुदत धरणे आंदोलनाचे निवेदन दिले असताना सुद्धा त्यावर कोणतीच कारवाई होताना दिसून येत नाही.त्यामुळे बेमुदत धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहेत.आणि भविष्यातही जर याची दखल घेतली गेली नाही तर,या आंदोलनाची व्याप्ती निश्चितच वाढत जाणार आहे.असा इशारा महासंघाचे जिल्हा संघटन प्रमुख भारतभाऊ टाकणखार,ता.सचिव अभिमन्यू इबिते.जि.उपाध्यक्ष वसंतभाऊ टाकणखार,रवी आदमाने,हनुमंत पांढरपोटे,राजेंद्र सातपुते,शिवाजी भाळशंकर,राहुल खुणे,गोरख उघडे,निलेश गावडे,किरण शिंदे,नारायण भाळशंकर,अमोल राऊत,धोंडीराम रामुळे,जीवन डोंगरे,किरण माने,सय्यद आयुब नागनाथ पडलवार,प्रवीण जाधव,सुमित घाडगे,गोविंद पवार,शंकर पवार,बळीराम घनगाव,नितीन पुटवाड,शेख मतीन,विजय वैराग्य,अविनाश येळंबकर,कृष्णा हौसरमल,राजकुमार सोनवणे,प्रतीक स्वामी व तालुकाप्रमुख राहुल टाकणखार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# अंबाजोगाई येथे शासकीय वसतिगृहात आदिवासी मुला-मुलींची प्रवेश प्रक्रिया सुरु

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जून**

अंबाजोगाई शहरात शिक्षण घेत असलेल्या इयत्ता ८ वी पासून पुढील वर्गातील सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणा-या अंबाजोगाई येथील आदिवासी मुलां मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे.

तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी wwwswayam.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर जावून ऑनलाईन अर्ज करावेत. काही अडचण आल्यास गृहपाल, आदिवासी मुलांचे- मुलींचे शासकीय वसतिगृह अंबाजोगाई जि. बीड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल यांनी केले आहे.

# देवगिरी प्रतिष्ठाण संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयास नॅक ‘बी’ ग्रेड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जून**



शिक्षण क्षेत्रात सातत्याने गुणवत्ता आणि प्रगतीकडे वाटचाल करणाऱ्या देवगिरी प्रतिष्ठाण संचालित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयांने राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषद (नॅक) कडून ‘बी’ ग्रेड मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.विशेष बाब म्हणजे हे महाविद्यालय कायम विनाअनुदानित असूनही गुणवत्तेचे निकष पूर्ण करताना हे मानांकन मिळवण्यात यशस्वी ठरले आहेत.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना कार्यशाळेचे निमंत्रण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर संकुलात कार्यशाळा घेण्यात येणार आहे. पुणे येथील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून येण्याबाबत निमंत्रण देण्यात आले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेतील बदल आणि सुधारणांसाठी एक महत्त्वपूर्ण धोरण आहे. या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना अधिक लवचिक, समग्र आणि २१ व्या शतकातील गरजांना अनुरूप शिक्षण देणे हा आहे. या विषयावर राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात कार्यशाळा घेण्यात येणार आहे. प्रारंभी संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी डॉ. देवळाणकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून कार्यशाळेचे निमंत्रण दिले. यावेळी संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायभाये आदी उपस्थित होते.





### संक्षिप्त वृत्त...

## जिल्हाधिकारी ठाकूर यांनी केला नेत्रदानाचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** जागतिक दृष्टीदान दिन आणि आपला वाढदिवस यांचे औचित्य साधून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी नेत्रदानाचा संकल्प करून एक प्रेरणादायी पाऊल उचलले.



जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरच्या दयानंद सभागृहात आयोजित नेत्रदान संकल्प अभियान कार्यक्रमात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी स्वतःच्या स्वाक्षरीने संकल्प पत्र भरून नेत्रदानाचा दृढनिश्चय जाहीर केला.

यावेळी त्यांनी उपस्थित महसूल अधिकारी, कर्मचारी यांनी या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. पाठक यांनी नेत्रदानाचे महत्त्व, त्याची गरज व कार्यपध्दती याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी क्षेत्रीय अधिकारी जयंत क्षीरसागर, नेत्र चिकित्सा अधिकारी आर. पी. वाघमारे, संकेत लंपाटे, विनायक सोनटक्के व जिल्हा अंधत्व नियंत्रण समितीचे सदस्य उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** शिष्यवृत्तीसाठी २०२३-२४ साठी रि-अप्लाय आणि २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी नवीन शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी महाडीबीटी पोर्टल सुरू झाले असून अर्ज भरण्यासाठी १५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील शासनमान्य, अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क फ्रिशीप, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी निर्वाह भत्ता योजनेचा लाभ घेता येईल. सर्व प्राचार्य, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अर्ज अचूक भरून १५ जून २०२५ पूर्वी ऑनलाइन सादर करावेत.

## साहित्य भारतीच्या कार्यकारिणीत साहित्यिक कारंडे यांचा समावेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्यभारती लातूरची वर्ष २०२५-२६ साठी जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली.जिल्हा अध्यक्षपदी शैलजा कारंडे यांची नुकतीच निवड करण्यात आली.

उपाध्यक्ष म्हणून चाकूर येथील डॉ.राजेश तगडपल्लेवार व चापोली येथील डॉ.विजयकुमार ढोले,कार्याध्यक्ष म्हणून अहमदपूर येथील प्रा.डॉ.रामचंद्र पस्तापुरे,संघटन मंत्री म्हणून लातूर येथील उमेश सेलूकर,सहसंघटन मंत्री म्हणून हाडोळती येथील प्रा.डॉ.बालाजी भंडारे तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून लातूर येथील डॉ.रामशेट्टी शेटकार यांची निवड करण्यात आली.जिल्हा कार्यकारणी सदस्यपदी डॉ.प्रदीप पाटील,डॉ.प्रणिता चाकूरकर , प्रा.अश्विनी निवर्गी, प्रा.डॉ.जितेंद्र शेळके यांची निवड करण्यात आली.

## कन्यादान योजनेसाठी सामूहिक विवाह सोहळ्यांचे प्रस्ताव मागवले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** छत्रपती संभाजीनगर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी कन्यादान योजनेअंतर्गत सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. या योजनेचा उद्देश विवाहातील अनुचित प्रथा रोखणे आणि सहभागी दाम्पत्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे.

प्रस्ताव विहित नमुन्यातील अर्जासह (कार्यालयात उपलब्ध) सादर करावेत. संस्थांनी विवाहाचे ठिकाण, तारीख आणि वर-वधूंच्या सत्यप्रत अर्जासह प्रस्ताव पाठवावेत असे कळविण्यात आले आहे.

# लातूर शहरात सर्वत्र वटसावित्री पौर्णिमा उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** लातूर जिल्ह्यात सर्वत्र उत्साहाच्या वातावरणात महिलांनी वट पौर्णिमा साजरी केली. शहरातील सर्वात मोठ्या हेरिटेज ट्री साधारण सव्वाशे वर्षे वयाच्या वटवृक्षाच्या सानिध्यात महिला डॉक्टर्स, महिला आय.एम.ए. च्या सदस्या, लातूर वृक्ष चळवळ, समाजकल्याण विभाग, सह्याद्री देवराईच्यावतीने सामाजिक न्याय भवन परिसरात वटसावित्री पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी महिला डॉक्टर्सनी लातूरमधील या हेरीटेज ट्री वडाचे





ऋण व्यक्त केले. यावेळी लातूर वृक्ष चळवळीला १०० वडांची रोपे भेट देण्यात आली. ही रोपे लातूर वृक्ष चळवळीच्या श्वेता लोंढे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

यावेळी आय.एम.ए.च्यावतीने अध्यक्षा डॉ. ज्योती सूळ यांनी या उपक्रमाची भूमिका मांडली. तर सह्याद्री देवराई, लातूर वृक्ष चळवळीचे मुख्य समन्वयक सुपर्ण जगताप यांनी झाड आहे तर आपलीही वाढ आहे ही वृक्ष प्रार्थना, प्रतिज्ञा सर्वांकडून म्हणवून घेतली. समाजकल्याण विभागाचे उपायुक्त अविनाश देवशटवार यांचा तिन्ही संस्थांच्यावतीने डॉ. सूळ यांनी सत्कार केला.

यावेळी सुपर्ण जगताप म्हणाले, वड हे आपल्या ऋषीमुनींनी सांगितल्याप्रमाणे शांती देणारे, नवचैतन्य निर्माण करणारे, मुंगीपासून हत्तीपर्यंत प्राण्यांना अन्न, प्राणवायू देणारे झाड आहे. या झाडाच्या सानिध्यात नकारात्मकता, डिप्रेशन दूर होतात. अनेक औषध निर्मितीसाठी या वडांचा उपयोग केला जातो. आजच्या दिवशी आपण केवळ वडच नाही तर वडाच्या फायकस प्रजातीतील दीर्घायुषी असणाऱ्या उष्णकटिबंधातील झाडांचे संवर्धन केले तर खऱ्या अर्थाने वटसावित्री पौर्णिमा साजरी होईल, असे ते म्हणाले.

# विलासराव देशमुख वन उद्यानात केली वृक्ष लागवड



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** जिल्हा प्रशासनामार्फत वृक्षारोपण मोहिमेंतर्गत जास्तीत जास्त झाडे लावण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

वटपौर्णिमेचे औचित्य साधून प्रत्येक कुटुंबाने किमान १० झाडे लावावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी केले होते. वन विभागामार्फत साखरा येथील विलासराव देशमुख वन उद्यानात जिल्हाधिकारी ठाकूर यांच्या उपस्थितीत ५० वडाची रोपे लावून या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी 'रोहयो'च्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सहायक वनसंरक्षक वैशाली तांबे, सुनंदा जगताप, वनपरिक्षेत्र अधिकारी धनंजय पोटे, वनपरिमंडळ अधिकारी नीलेश बिराजदार, टी. एस. चिल्ले, पी. टी. देवकरण, वनरक्षक महेश पवार, बालाजी पाटील, गोविंद घुले, धम्मसागर कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### वटपौर्णिमा उत्साहात

जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत यंदाची वटपौर्णिमा वडाची झाडे लावून साजरी करण्यात आली. या उपक्रमाची सुरुवात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते साखरा येथील विलासराव देशमुख वन उद्यानात वडाचे झाड लावून झाली. यावेळी ५० महिलांनीही वडाची झाडे लावून या झाडांची पूजा केली.

## लातूर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने नुतन शिक्षणाधिकारी मठपती यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** लातूर येथील माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी म्हणून दत्तात्रय मठपती यांनी नुकताच पदभार घेतला. मठपती यांच्या नियुक्तीबद्दल लातूर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी मठपती यांचा यथोचित सत्कार केला. तसेच संस्थेच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी त्यांना निमंत्रणही देण्यात आले.

लातूरच्या एज्युकेशन हबचा संपूर्ण महाराष्ट्रात दबदबा आहे. शिक्षणाचा लातूर पॅटर्न देशभरात परिचित असून राज्यभरातील विविध भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी लातूर शहरात येतात.त्यामुळे येथील शिक्षण विभागाचे महत्वही तितकेच आहे. येथील माध्यमिक शिक्षण



विभागाचे शिक्षणाधिकारी म्हणून दत्तात्रय मठपती यांनी नुकताच पदभार घेतला.

त्याबद्दल लातूर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी आपल्या सहकायांसह शासकीय कार्यालयात जावून त्यांची भेट घेतली यावेळी संस्थेच्या वतीने शिक्षणाधिकारी मठपती यांचा सत्कार करून त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी विक्रम गोजमगुंडे यांनी लातूर एज्युकेशन सोसायटीच्या कार्याबाबत व शैक्षणिक उपक्रमांबाबत माहिती देवून विविध विषयांवर चर्चा केली. लातूर एज्युकेशन सोसायटीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा लवकरच सत्कार करण्यात येणार असून या सोहळ्यासाठी दयानंद मठपती यांनी उपस्थित रहावे अशी विनंती गोजमगुंडे यांनी केली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रल्हाद दुडीले, प्राचार्य संजय मलवाडे, मुख्य लिपीक अजय आरदवाड यांच्यासह इतर सहकारी उपस्थित होते.

## वाकलेल्या तारा व खांब केले दुरुस्त : वीजपुरवठा सुरळीत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** लातूर शहर आणि परिसरात रात्री आलेल्या वादळी वारे, पाऊस आणि विजेच्या कडकडाटामुळे जनजीवन विस्कळीत झाले. याच दिवशी रात्री १२ वाजल्यानंतर आलेल्या वादळी वाऱ्यामुळे प्रभाग क्रमांक १५ मधील कानडे हॉस्पिटल परिसरात अंधोरीकर यांच्या घरावर जवळपास २५ ते ३० फूट लांबीची मोठ्या झाडाची फांदी पडली.

यामुळे वीजपुरवठा खंडित झाला आणि ही फांदी चौकातील रस्त्यावर पडल्याने वाहतूकही ठप्प झाली होती. माजी मंत्री अमित देशमुख यांच्या कार्यालयातील पाठपूरावामुळे वाकलेल्या तारा व खांब दुरुस्त करून महावितरणने काही तासातच वीजपुरवठा सुरळीत केला.

वादळी पावसामुळे निर्माण झालेल्या या आपत्कालीन परिस्थितीची माहिती मिळताच, शहरचे आ. अमित देशमुख यांच्या कार्यालयाने जराही वेळ न घालवता तात्काळ महावितरण विभाग आणि संबंधित अभियंत्यांशी संपर्क साधला. या परीस्थितीची माहीती दिली, महावितरणने तातडीने रात्रीपासूनच सुरक्षिततेच्या दृष्टीने काही आवश्यक ठिकाणी वीजपुरवठा बंद ठेवला होता.

सकाळी सहा वाजता आमदार देशमुख यांच्या कार्यालयाने पुन्हा एकदा महावितरण आणि मनपा प्रशासनाशी संपर्क साधून यावर तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली होती.

## वादळी वाऱ्याने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदत द्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** लातूर व रेणापूर तालुक्यातील शहर आणि ग्रामीण भागाला ९ जून रोजी मध्यरात्री वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने जोरदार तडाखा दिला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार धीरज देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूर व रेणापूर तालुका काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांची भेट घेऊन निवेदन दिले.

तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची आणि विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. वादळी वाऱ्यामुळे शेतातील आंबा, जांभूळ, पेरू, चिकू यासारखी फळझाडे उन्मळून पडली आहेत. फळपिके, फळभाज्या



आणि फुलशेतीचे पूर्णतः नुकसान झाले आहे. विशेषतः केळीच्या बागा पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे.

तसेच अनेक घरांवरील पत्रे उडून गेली आहेत, विद्युत पोल वाकले आहेत. तारा तुटल्याने बऱ्याच ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. रस्त्यांवरील झाडे मोडून पडल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला असून, यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदत देण्यासह शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, अशी मागणी यावेळी शिष्टमंडळाने केली आहे.

# सफाई कामगारांचे काम बंद आंदोलन यशस्वी



### घंटागाड्या लावल्या पार्कवर

मंगळवारी सकाळी साडेदहा वाजल्यापासून महापालिकेच्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी सर्व वाहने, घंटागाड्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर लावून काम बंद आंदोलन सुरू केले होते. एकही सफाई कर्मचारी कामावर गेला नव्हता. त्यामुळे शहरातील सफाईचे, शहर स्वच्छतेचे काम बंद होते. सफाई कामगारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून आंदोलनाला सुरुवात केली होती. महापालिकेसमोर कामगारांनी घोषणाबाजी केली. त्यानंतर आयुक्तांनी कामगारांच्या शिष्टमंडळास चर्चेसाठी बोलावले आणि चर्चा झाल्यानंतर सफाई कामगारांच्या मागण्या येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन आयुक्त देविदास जाधव यांनी दिले.

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** महापालिका अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांना कायद्यानुसार किमान वेतन, पी. एफ., सुरक्षेची साधने, सुट्ट्या व रजा मिळाव्यात यासाठी आठ महिन्यांपासून प्रलंबित मागण्यांसाठी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्यावतीने मंगळवारी काम बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. याची महापालिका आयुक्त देविदास जाधव यांनी दखल तत्काळ घेतली. शिष्टमंडळासोबत चर्चा करून १५ दिवसांच्या आत त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक राजकुमार होळीकर, भटक्या विमुक्तांचे नेते प्रा. सुधीर अनवले, लेबर युनियनचे नेते डॉ. सुधीर देशमुख, शेतकरी कामगार पक्षाचे नेते ॲड. उदय गवारे, अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे शहराध्यक्ष विशाल काळे, ज्योती उपाडे, लहू जगताप, परमेश्वर कांबळे, महेंद्र कांबळे, सुधीर कांबळे, आयुब शेख, ईश्वर काळे, सुनील सगट, सचिन काळे, अंजना सगट, अभिजित बनसोडे, कुमार कांबळे, अमोल शिंदे, रोहित कांबळे, अन्तेश्वर सगट, अंगद बनसोडे, सूर्यकुमार गायकवाड, ईश्वर कासारे, विनोद मोरे, पवन लांडगे, सचिन देसाई, रमाकांत शिंदे, अमोल अडसूळ यांच्यासह अन्य कामगार पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

## आयुक्तपदी मानसी मीना यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -**



येथील महापालिकेच्या आयुक्तपदी गडचिरोलीच्या देसाईगंज येथील सहायक जिल्हाधिकारी मानसी मीना यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी काही दिवसांपूर्वी पिस्तूलमधून स्वत:च्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केला. उपचारानंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. दरम्यान, शासनाने आयुक्त पदाचा पदभार उपायुक्त देविदास जाधव यांच्याकडे सोपविला होता. मंगळवारी शासनाच्यावतीने मानसी मीना यांची आयुक्तपदी नेमणूक करण्यात आली आहे.

## लग्न कार्यासाठी घरात ठेवलेल्या पैशावर डल्ला : चोरटे अटकेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ जून -** मुलीच्या लग्न कार्यासाठी घरात ठेवलेल्या पैशावर डल्ला मारणाऱ्या दोघा चोरट्यांना १२ तासांच्या आत अटक करून गांधी चौक पोलिसांनी चोरीस गेलेली २ लाख ८० हजार रुपयांची रोकड व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण ३ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शहरातील लाड गल्ली येथील एका घराचा कडी-कोयंडा तोडून, लोखंडी पेटीचे कुलूप तोडून मुलीच्या लग्न कार्यासाठी ठेवलेले २ लाख ८० हजार रुपये चोरी केल्याची घटना रविवारी घडली होती. याप्रकरणी प्रणिता गंगालाल डांगूर यांच्या तक्रारीवरून गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,



अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे आणि शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांच्या नेतृत्वातील पथक या गुन्ह्याचा तपास करीत होते. दरम्यान, पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे सतीश हकूमचंद लाड (वय ५०) आणि संतोष विजयकुमार चापोलीकर (वय ४५, दोघेही रा. लाड गल्ली, लातूर) यांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरीस गेलेली २ लाख ८० हजार रुपयांची रोकड व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण ३ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अक्रम मोमीन, पोलीस अंमलदार राजेंद्र टेकाळे, प्रकाश भोसले, राम गवारे, शिवाजी पाटील, संतोष गिरी यांनी ही सेवा बजावली.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## केंद्र सरकारच्या विरोधात काँग्रेसचा शनिवारी मशाल मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ जून -**

महाराष्ट्रातील नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुका संदर्भात काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी व काँग्रेस पक्षाने वेळोवेळी आक्षेप घेतलेले आहेत.

निवडणूक आयोगाच्या माध्यमातून झालेल्या गैरप्रकारा संदर्भात पक्षाच्या वतीने उपस्थित केलेल्या शंकांचे अद्यापही निराकरण केलेले नाही.

यासंदर्भात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून व माजी मंत्री अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर व धाराशिव जिल्ह्यामध्ये विधानसभा निवडणुकीत झालेल्या गैरप्रकार विरुद्ध काँग्रेस पक्षाने आंदोलनात्मक कार्यक्रम हाती घेऊन निवडणूक आयोग व केंद्र सरकारच्या विरोधात मशाल मोर्चा काढण्याचा निर्धार केला आहे.

शनिवार दि.१४ जून रोजी सायंकाळी ६ वाजता श्री तुळजाभवानी मंदिर महाद्वारापासून भवानी ज्योत घेऊन, आर्य चौक, कमान वेस, धाराशिव रोड, जुने बस स्टॅन्ड, गोलाई, छत्रपती शिवाजी महाराज

चौक पर्यंत मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चाचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे होणार आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### इटकळ व परिसरात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

**इटकळ, दि.११ जून -**

तुळजापूर तालुक्यातील इटकळ व परिसरात वटपौर्णिमा सण मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला.पतीला दीर्घायुष्य लाभावे व जन्मोजन्मी हाच पती मिळावा म्हणून सुवासिनीने वडाची (वटवृक्ष) मनोभावी पूजा केली. ग्रामीण भागात सणवार यांना फार महत्व असते ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमा ही वटपौर्णिमा म्हणून साजरी करण्याची परंपरा आहे. सावित्रीने आपल्या पती सत्यवान यांचा प्राण परत आणण्यासाठी वटवृक्षाखाली बसून कठोर तपचर्या केली. त्यामुळे यम राजाला तिचा पती परत द्यावाच लागला अशी सत्यवान व सावित्रीची कथा आहे. दि.१० जुन रोजी इटकळ व परिसरात महिलांनी वडाच्या झाडाची पूजा केली. मराठमोळी साडी परिधान करून शृंगार करीत हातामध्ये पूजेसाठी लागणारे साहित्य घेऊन जाताना दिसत होत्या. यावेळी महिला एकमेकाला हळदी-कुंकू लावून वाण ही देत होत्या.

#### ठाकूर यांच्याकडून सांत्वनपर भेट

**लोहारा, दि.११ जून -**

भारतीय जनता पार्टीचे नेते राहुल पाटील सास्तूरकर आणि माजी जि.प. सदस्य तथा सरपंच शितल पाटील यांचे चिरंजीव नहुष राहूल पाटील यांच अपघातात निधन झाले आहे.




दि.१० जून रोजी भाजपा नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी त्यांच्या लोहारा तालुक्यातील सास्तुर येथील निवासस्थानी जाऊन पाटील कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी राहुल पाटील, दौलत पाटील, हर्षवर्धन पाटील, माधव पवार, राजेंद्र पाटील, गणेश खरसडे, सिद्धेश्वर माने, इकबाल मुल्ला, नेताजी शिंदे, बालाजी चव्हाण, मोहन जेवळीकर, शाहुराज पाटील, किसन पवार, महादेव कोरे, श्रीमंत मनाळे, प्रविण मनाळे आदि उपस्थित होते.



#### पीएचसी मध्ये नेत्र तपासणी शिबिर संपन्न

**अणदूर, दि.११ जून -**

डॉ. भालचंद्र स्मृती दिन पंधरवडा निमित्त प्रा.आ. केंद्र अणदूर येथे एकूण ३७ रुग्णांची नेत्र तपासणी डॉ.काटकर ए.एल. नेत्र चिकित्सा अधिकारी यांनी केली. पैकी १७ रुग्णांना नेत्र शस्त्रक्रियेसाठी जिल्हा रुग्णालय धाराशिव येथे पाठविण्यात आले. ४५ वर्षांवरील ९ लोकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तसेच युवराज होळे यांच्या सह ६ लोकांनी मरणोत्तर नेत्र दान करण्याचा संकल्प केला व त्यांनी फॉर्म भरून दिला. जास्तीत जास्त लोकांनी मरणोत्तर नेत्र दान करावे, असे आवाहन डॉ. विशाखा वडवळे वैद्यकीय अधिकारी प्रा.आ. केंद्र अणदूर यांनी केले. या शिबिरास डॉ. विशाखा वडवळे यांच्या मार्ग दर्शनाखाली व प्रा.आ. केंद्र अणदूर येथील सर्व आरोग्य कर्मचारी यांनी सहकार्य केले.



#### शिंदे, आदलिंगे यांचा निवडीबद्दल सत्कार

**परंडा, दि.११ जून -**

सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांनी सावता परिषदेचे निष्ठावंत कार्यकर्ते बापूसाहेब शिंदे यांची मराठवाडा कार्याध्यक्ष व धनंजय आदलिंगे यांची धाराशिव युवक जिल्हाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल दि.१० जुन मंगळवार रोजी परंडा येथे सावता परिषदेचे वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिवाजी येवारे मुख्य संघटक सावता परिषद महाराष्ट्र राज्य, धोंडीराम मोहोळकर, अर्जुन सायकर, गटकुळस, राजु आलबत्ते उपस्थित होते.



#### संत तुकाराम महाराजांच्या वंशजांनी घेतले तुळजाभवानीचे दर्शन

**तुळजापूर, दि.११ जून -**

संत तुकाराम महाराज यांचे १० वे वंशज हभप. सच्चीदानंद महाराज मोरे-देहूकर आणि ११ वे वंशज हभप. ऋषिकेश महाराज मोरे-देहूकर यांनी आज सहकुटूंब श्रीतुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. मंदिर संस्थानकडून त्यांचा देवीची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे व अभिजित तेरखेडकर उपस्थित होते.

## महाराष्ट्राबरोबरच जिल्ह्याच्या वाट्यालाही अभूतपूर्व निधी संकल्पसे सिद्धीतक झेप

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जून -**

यूपीएच्या १० वर्षाच्या सत्ताकाळात महाराष्ट्राच्या वाट्याला साधारणपणे १ लाख कोटी रुपये निधी मिळाला होता. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागील अकरा वर्षाच्या कार्यकाळात राज्याच्या वाट्याला आलेला निधी युपीए सरकारच्या दहापट म्हणजेच १० वर्षात १० लाख कोटी रुपये एवढा आहे. नरेंद्र मोदी यांच्यामुळे राज्याला ऐतिहासिक फायदा झाला आहे आणि महाराष्ट्राबरोबरच धाराशिव जिल्ह्याच्या वाट्यालाही अभूतपूर्व निधी मिळाला असल्याची माहिती मित्रचे अध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

भाजपाच्या प्रतिष्ठान भवन कार्यालयात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या ११ वर्षाच्या यशस्वी पुर्ततेबद्दल पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार पाटील बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देशभरात झालेल्या अनेक अभूतपूर्व योजना, उपक्रम आणि विकासकामांचा आलेख त्यांनी उपस्थितांसमोर सादर केला. माता-भगिनींच्या आयुष्याला अधिक सक्षम करण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दलही त्यांनी जिल्ह्यातील माता-भगिनींच्या वतीने नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

त्याचबरोबर केंद्र सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि धाराशिव जिल्ह्याच्या वाट्याला आलेल्या अनेक महत्त्वपूर्ण आणि भरीव बाबींची त्यांनी माहिती दिली. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सलग तीन वर्ष जिल्हा राज्यात अव्वल ठरला. जिल्ह्यातील दीड हजारपेक्षाही अधिक युवकांनी या उपक्रमाच्या माध्यमातून स्वतःचा नवा उद्योग सुरू केला आहे. त्यांच्या या उद्योगाच्या माध्यमातून स्वतःसह त्यांनी इतरांसाठीही रोजगाराच्या संधी निर्माण केल्या असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी सांगितले.

धाराशिव जिल्ह्यातील कौडगाव एमआयडीसीमध्ये तांत्रिक वस्त्रोद्योग निर्मिती प्रकल्प सुरू करण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधांना वेग आला आहे. देश पातळीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय टेक्निकल टेक्सटाईल मिशन हे धोरण जाहीर केले आहे. त्याचा फायदा आपल्या जिल्ह्यातील कौडगाव एमआयडीसीलाही होणार आहे. त्यामुळे देशातील आणि परदेशातील इच्छुक गुंतवणूकदारांना मोठ्या प्रमाणात परतावा आणि वेगवेगळ्या सोयी सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यातून जिल्ह्यात दहा हजाराहून अधिक रोजगार निर्मिती उपलब्ध होणार असल्याचा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

पर्यटन, रेल्वे त्याचबरोबर रस्ते विकास, उड्डाणपूल, पर्यायी रस्ते, महामार्गावर विद्युत व्यवस्था, विविध प्रकारचे अनुदान अशा अनेक बाबींच्या माध्यमातून जिल्ह्याला केंद्र सरकारच्या माध्यमातून अभूतपूर्व असा निधी प्राप्त झाला आहे. एकट्या धाराशिव जिल्ह्यात ६,५०० कोटी रूपयांची २४ राष्ट्रीय महामार्गाची कामे मंजूर केली आहेत. त्यातील ११ कामे पूर्ण झाली असून उर्वरित १३ कामे सध्या प्रगतीपथावर आहेत.

धाराशिवकरांची गरज व मागणी लक्षात घेवून तुळजापूर-नळदुर्ग, तुळजापूर-औसा, धाराशिव शहरातील बाय पास, तुळजापूर बाय पास, सिंदफळ व येडशी येथे उड्डाणपूल, या कामांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मंजूरी दिली.



सूरत-चेन्नई महामार्ग, सोलापूर-धुळे, सोलापूर-उमरगा असे महामार्गाचे जाळे धाराशिव जिल्ह्यात आज निर्माण झाले आहे. युपीए सरकारच्या काळात धाराशिव जिल्ह्यात केवळ १९५ किलोमीटर लांबीचा राष्ट्रीय महामार्ग होता. आज त्याच राष्ट्रीय महामार्गाची जिल्ह्यातील लांबी ४१८ किलोमीटर एवढी झाली आहे. मागील केवळ ११ वर्षांच्या काळात धाराशिव जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी २२३ किलोमीटर इतकी वाढली आहे.

प्रधानमंत्री विमा योजनेच्या माध्यमातून खरीप २०२० पासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जवळपास २००० कोटी रुपये मिळाले असून संकल्प केला आणि तो सिद्धीस नेला म्हणून तर संकल्प से सिद्धीतक हा मूलमंत्र घेऊन देशातील आणि राज्यातील आपले सरकार सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी अखंड कार्यरत असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

## प्रेमसंबंधासाठी धमकी; तरुणीची आत्महत्या

### दोन जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जून -**

तुळजापूर येथील पोलिस वसाहतीत एक हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. १५ वर्षीय सारिका बिजली शिकारे या अल्पवयीन मुलीने आत्महत्या केल्याच्या प्रकरणात तिच्यावर प्रेम करण्यासाठी जबरदस्ती व धमकी दिल्याचा आरोप करत दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सारिका शिकारे ही मूळची राजेश नगर ढोकी (ता. धाराशिव) येथील असून, हल्ली तिचे वास्तव्य पोलीस कॉर्टर, एस.टी. कॉलनी, तुळजापूर येथे होते. ३१ मे रोजी सकाळी ४ वाजता राहत्या घरी तिने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी तिच्या आईने १० जून रोजी तुळजापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

फिर्यादीत म्हटले आहे की, ओंकार कांबळे व नगिना शशिकांत पांडागळे (दोघेही रा. कांक्रबा, ता. तुळजापूर) यांनी सारिकाला वेळोवेळी बोलावून ओंकार कांबळे याच्याशी प्रेम संबंध ठेव व लग्न कर, अन्यथा सोशल मिडियावर बदनामी करीन तसेच माझ्याकडील पिस्तुलाने तुला मारून टाकीन, अशी धमकी दिली. या मानसिक व भावनिक छळामुळे त्रस्त होऊन सारिकाने आयुष्य संपवले, असे तिच्या आईचे म्हणणे आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत तुळजापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणामुळे तुळजापूर शहरात खळबळ माजली असून, अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या मानसिक छळाच्या घटनांकडे प्रशासन गंभीरतेने पाहत आहे. पोलीस पुढील तपास करत असून संबंधित आरोपींवर कठोर कारवाई होण्याची मागणी होत आहे.

## ८ पुजाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ जून -**

श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करून थुंकणाऱ्या आठ पुजाऱ्यांवर मंदिर संस्थानने कडक कारवाईची भूमिका घेतली आहे. संबंधित पुजाऱ्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली असून, तीन महिन्यांसाठी मंदिरप्रवेश बंदीची कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

संबंधित पुजाऱ्यांनी मंदिर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ खाऊन थुंकल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे आढळून आले आहे.

## उबाठा गटाच्या उपजिल्हाप्रमुखपदी डॉ. कानडे

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.११ जून -**

अणदूर नगरीचे सुपुत्र श्री श्री गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष तथा अणदूर ग्रामपंचायत सदस्य डॉ. जितेंद्र कानडे यांची शिवसेना (उबाठा) गटाच्या धाराशिव जिल्हा उपजिल्हाप्रमुख पदी (तुळजापूर विभाग कार्यक्षेत्र) निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे अणदूर परिसरातून स्वागत होत आहे.



डॉ. जितेंद्र कानडे हे गेली अनेक वर्षे शिवसेना उबाठा गटाचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय कार्य अणदूर परिसरात मोठ्या प्रमाणात असून त्याचा निश्चित फायदा येणाऱ्या काळात पक्षाला मिळणार आहे. ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असताना झालेली ही निवड पक्षाला फायदेशीर ठरणार आहे. ४ टर्म अणदूर ग्राम पंचायत सदस्य असलेले डॉ कानडे हे बेरजेचे राजकारण करतात. त्यांच्या निवडीचे सर्व सामान्य शिवसैनिकांनी स्वागत केले आहे.

ही निवड शिवसेना (उबाठा)प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार करण्यात आली आहे.

## विद्युत पोल शिफ्टिंग काम आधी; टेंडर नंतर

### दै. तरुण भारतच्या बातमीनंतर नळदुर्ग नगरपालिकेचे टेंडर अखेर रद्द...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ जून -**

नळदुर्ग नगरपालिकेने आधीच पूर्ण झालेल्या कामासाठी नंतर टेंडर काढल्याचा प्रकार उघड झाल्याने अखेर संबंधित निविदा रद्द करण्यात आली आहे. दै. तरुण भारतने दि.९ जून रोजी प्रसिद्ध केलेल्या टेंडरपूर्वीच काम पूर्ण, नळदुर्ग न.प. च्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह या वृत्तानंतर प्रशासनावर दबाव निर्माण झाला होता. त्यानंतर ६ जून रोजी काढलेले विद्युत पोल शिफ्टिंग आणि नवीन पोल बसविण्याचे टेंडर नगरपालिकेने रद्द केले असल्याचे अधिकृतपणे जाहीर करण्यात आले आहे.


टेंडरपूर्वीच काम पूर्ण; नळदुर्ग न.पा.च्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह

हुतात्मा निलय्या स्वामी उद्यान परिसरातील विद्युत पोलचे शिफ्टिंग आणि नवीन पोल बसविण्याचे काम आधीच पूर्ण झाल्याची माहिती असूनदेखील, त्याच कामासाठी टेंडर निघाले होते. या प्रकारामुळे प्रशासनाचा नियमनशून्य व आंधळा कारभार समोर आला आहे. नगरपालिकेने टेंडर रद्द केले असले, तरी हे काम कोणाच्या सांगण्यावरून आधी केले गेले, त्याला संबंधित विभागांनी परवानगी दिली होती का, हे अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत.

या प्रकारात विद्युत विभाग प्रमुख आणि वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आहे. वीज वितरण कंपनीच्या कार्यालयासमोरच हे काम झाले असूनही त्यांनी परवानगी दिली का, किंवा त्यांच्या माहितीतच हे काम झाले का, याचा खुलासा आवश्यक आहे. शिवाय, कामासाठी आवश्यक शुल्क व मंजुरी घेतली होती का, याची चौकशी करणे गरजेचे आहे.

या प्रकारात दोषींवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांमध्ये आणि काही सामाजिक संघटनांमध्ये तीव्र होत आहे. नगरपालिकेने केवळ टेंडर रद्द करून जबाबदारी झटकू नये, तर दोषींवर कठोर कारवाई करून अशा प्रकारांना लगाम घालावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## दिव्यांग व जेष्ठ नागरिकांसाठी करणार शिबिरांचे आयोजन : खा. राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जून -**

धाराशिव लोकसभा मतदार संघातील दिव्यांग व ६० वर्षे वयोमर्यादा पूर्ण केलेल्या जेष्ठ नागरिकांसाठी मोफत अत्याधुनिक साहित्य वाटपासाठी तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमासाठी भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या दिव्यांगजन स्वशक्तीकरण विभागाकडून अधिकृत मंजुरी प्राप्त झाली असून, याचे आयोजन खासदार ओम राजे निंबाळकर यांच्या पुढाकाराने करण्यात येत आहे.



या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पूर्व नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीकरीता आ. कैलास पाटील उपस्थित होते.

## मर्डी येथे डंपर-मोटारसायकल अपघातात युवकाचे दुर्दैवी निधन

### पत्नी-मुलीस गंभीर दुखापत...

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.११ जून -**

तुळजापूर तालुक्यातील कुंभारी गावातील रहिवासी हुसेन आल्लावद्दिन मुलानी (वय ३४ वर्षे) यांचा मर्डी-होनसळ रस्त्यावर डंपर आणि मोटारसायकलच्या भीषण अपघातात जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना सोमवार, ९ जून रोजी सायंकाळी ५ ते ६ च्या दरम्यान घडली.

हुसेन मुलानी हे त्यांच्या पत्नी व मुलीसह मर्डी येथील नातेवाइकांच्या कार्यक्रमातून परत येत असताना, मर्डीपासून अंदाजे एक-दोन किलोमीटर अंतरावर समोरून भरधाव वेगात आलेल्या डंपरने त्यांना जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की हुसेन यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी व मुलीस गंभीर मार लागला असून त्यांच्यावर सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



मंगळवार, १० जून रोजी कुंभारी येथील कब्रस्तानात शोकाकुल वातावरणात हुसेन यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, तीन मुली व भाऊ असा मोठा परिवार आहे.


### पालकमंत्री प्रताप सरनाईक आज नळदुर्ग दौऱ्यावर...

## ऐतिहासिक किल्ल्याची पाहणी, विकास कामांना गती देण्याची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ जून -**

राज्याचे परिवहन मंत्री आणि धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक हे १२ जून रोजी नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्याला भेट देणार आहेत. या दौऱ्यानिमित्त नळदुर्ग शहर व परिसरातील नागरिकांमध्ये अपेक्षांचे वातावरण तयार झाले असून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे.

पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते पूर्वी थाटामाटात उद्घाटन करण्यात आलेल्या नळदुर्ग उपजिल्हा रुग्णालयाच्या अर्धवट स्थितीकडे त्यांचे लक्ष वेधले जाणार आहे. अत्याधुनिक यंत्रणा आणि सुविधा असूनही रुग्णालयातील अनेक जागा रिक्त असल्यामुळे हे रुग्णालय केवळ प्राथमिक उपचारापुरते मर्यादित राहिले आहे. विशेषतः भुलतज्ज्ञाच्या अनुपस्थितीमुळे कोणतीही शस्त्रक्रिया न होणं ही गंभीर समस्या बनली आहे. अपघातग्रस्त रुग्णांना सोलापूरला हलवावे लागते, ज्यामुळे वेळेअभावी जीवितहानी होण्याची शक्यता वाढते.



स्थानिक नागरिक, समाजसेवक आणि आरोग्य क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी पालकमंत्र्यांनी या रिक्त जागा तातडीने भराव्यात व रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यरत करावे, अशी ठाम मागणी केली आहे.

तसेच, पालकमंत्र्यांनी पूर्वी मंजूर केलेल्या ध्वज स्तंभाच्या कामाला देखील अद्याप सुरुवात झालेली नाही. ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्याच्या संवर्धनासाठी हा स्तंभ महत्त्वाचा असून, त्याचे काम त्वरित सुरू करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

नळदुर्ग शहरातील बेरोजगारीही एक गंभीर प्रश्न आहे. परिसरात कोणतेही उद्योगधंदे नसल्याने तरुणाई उदासीन झाली असून अनेक तरुण व्यसनांच्या आहारी जात आहेत. उद्योगधंद्यांना चालना देऊन रोजगार निर्मितीसाठी पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

याशिवाय, शहरातील अतिक्रमणाच्या प्रश्नावर देखील पालकमंत्र्यांनी लक्ष घालून जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी होत आहे.

### जाहीर प्रगटन

धाराशिव जिल्ह्यातील विशेषत : तुळजापूर तालुका व आसपासच्या परिसरातील तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, जाहीर नोटिस देणार पंडित सुदाम चव्हाण रा. चव्हाणवाडी, ता. तुळजापूर, धाराशिव हे चव्हाणवाडी येथील रहिवासी असून त्यांची पत्नी कौशल्या या मयत आहेत. त्यांना प्रदीप हा मुलगा असून तो व त्याची पत्नी माधुरी हे नोटीस देणार पंडित यांचेपासून वेगळे राहतात. आमचे अशील पंडित यांची मौजे काटगांव, ता. तुळजापूर शिवारातील जमीन गट क्र. १८०/अ/१ क्षेत्र ०२ हे ०० आरव गट क्र. १८१/ड/५ क्षेत्र ०२ हे ५७ आर या शेतजमीनी मालकी व कब्जेवहिवाटीच्या आहेत . सदर जमीन नोटिस देणार यांची स्वसंपादित मिळकत असून सदर शेत जमिनीचा मी एकमेव मालक कब्जे वहिवाटदार आहे. मौजे चव्हाणवाडी ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामपंचायत घर क्र. ३०२ व ६० या तसेच तुळजापूर न.प. हद्दीतील घरजागा ज्याचा न.भू.क्र. ३०३ असा आहे या सर्व जागा नोटीस देणार यांचे स्वसंपादित मिळकती आहेत.

परंतु नोटीस देणार यांचे वृद्धापकाळाचा गैरफायदा घेऊन फसवणूक करून त्यांचा मुलगा प्रदीप चव्हाण याने बनावट संमतीपत्र तयार करून घेतले व वरील सर्व मौजे काटगांव, ता. तुळजापुर शिवारातील जमीन गट क्र. १८०/अ/१ क्षेत्र ०२ हे ०० आर व गट क्र. १८१/ड/५ क्षेत्र ०२ हे. ५७ आर या शेतजमीनीची स्वतःचे नावे नोंद करून घेतली. सदरचे संमतीपत्र व त्यावरून घेण्यात आलेली महसूली नोंद बनावट व बेकायदेशीर असून माझे हक्कावर बंधनकारक नाहीत. याबाबत आमचे अशील यांनी महसूल दफ्तरी वेळोवेळी आक्षेप दिलेला आहे तसेच सदर संमतीपत्र बनावट असलेबाबत व त्यावरून घेतलेल्या नोंदी कमी करणेबाबत उपविभागीय अधिकारी तथा अध्यक्ष जेष्ठ नागरिक न्यायाधिकरण तुळजापूर यांचेकडे अर्ज दिलेला असून सदर वाद न्यायप्रविष्ट आहे.

सदर शेत जमिनीची मालकी व कब्जा अद्यापपावेतो आमचे अशील पंडित सुदाम चव्हाण यांचा आहे. परंतु ७/१२ झालेल्या चुकीच्या नोंदीचा गैरफायदा घेऊन मुलगा प्रदीप व त्याची पत्नी माधुरी सदर मिळकत विक्री किंवा अन्य प्रकारे हस्तांतरित करण्याचे बेतात असल्याचे समजते. तसेच तुळजापूर न.प. हद्दीतील घरजागेवर बनावट कागदपत्रा आधारे खाजगी फायनान्स कंपनी कडून कर्ज घेतलेले असल्याचे समजते. सदर कर्ज देणार यांचा व सदर कर्जाचा माझ्याशी वा माझे मिळकतीशी कसलाही हक्क संबंध नाही वा सदर गैरप्रकारास मी बांधील नाही. परंतु आमचे आशिलाचा मुलगा प्रदीप व त्याची पत्नी माधुरी हे सदर मिळकती गुंड व भांडखोर व्यक्तींना विक्रीचे उद्देशाने दाखवत आहेत व अश्या व्यक्तींपासून आमचे आशिलाचे जीवितास व मालमत्तेस धोका आहे. आमचे आशिल वयोवृद्ध असून सदर मिळकत ही आमचे आशिलाचे उपजीविकेचे व वास्तव्याचे एकमेव साधन आहे.

तरी या जाहीर नोटिसद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, मौजे काटगांव, ता. तुळजापूर शिवारातील जमीन गट क्र. १८०/अ/१ क्षेत्र ०२ हे. ०० आर व गट क्र. १८०/ड/५ क्षेत्र ०२ हे ५७ आर बाबत कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, करार, मदार, इत्यादि कोणत्याही प्रकारचे हस्तांतर, नोंदणीकृत वा अनोंदणीकृत दस्त करू नये, केल्यास तो आमचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही व आम्हाला नाइलाजाने आपणाविरुद्धा कायदेशीर कार्यवाही करावी लागेल.

**सबब हे जाहिर प्रगटन दिले**
**दि.११/०६/२०२५**
**तर्फे,**
**अॅड. ए.ए. देशमुख,**
**प्रसाद कॉलनी, धाराशिव.**

**जाहीर प्रगटन देणार**
**पंडित सुदाम चव्हाण**

# लोणीकर साहेब दिव्याखालीच अंधार झालाय!

## आ.लोणीकरांच्या समर्थकाने सत्तेचा गैरवापर करून केला ग्रामपंचायतीत लाखो रूपयांचा भ्रष्ट्राचार!



## गुत्तेदाराने अधिकाऱ्यांना हाताशी धरून शासनाला फसविले लाखो रुपयांना!

**गावाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्य नागरीकांसाठी आत्मदहन करण्याची तयारी!** गेल्या दोन वर्षोपासून निवेदनात नमूद केलेल्या विकासकामांच्या मागण्या बरगळत ठेवण्यात आल्यात आहेत. संपूर्ण गावाने उपोषण केले विविध वृत्तपत्रात बातम्या आल्या मात्र गुत्तेदार आणि अधिकारी यांना काहीही फरक पडत नाही त्यामुळे शेवटी बरगळत ठेवलेले विकासकामे मार्गी लागणार नाहीत असे दिसून आल्यामुळे आमरण उपोषण करण्याची वेळ आली असुन संबंधीत गुत्तेदार आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांनी लोणीकर पिता-पुत्रांना बदनाम करण्याचे षडयंत्र रचल्यामुळे आपणावर उपोषण करण्याची वेळ आली असुन त्यांनी केलेल्या भ्रष्ट्राचाराची चौकशी न झाल्यास आपण आत्मदहन देखील करू असा इशारा देण्यात आला आहे.



**तभा वृत्तसेवा**
**परतुर । प्रतिनिधी**

माजीमंत्री तथा परतुर-मंठा विधानसभा मतदार संघाचे भाग्यविधाते आमदार बबनराव लोणीकर हे भ्रष्ट्राचार विरोधी नेते तथा सर्वसामान्यांचे हित जपणारे आणि शासनाच्या विविध योजनेंचा सर्वसामान्यांपर्यंत लाभ पोहचविण्यासाठी सदैव कार्यरत असल्याची ओळख त्यांची राज्यात सर्वत्र आहे, परंतु त्यांच्याच मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात असलेली मौजे वैजोडा ग्रामपंचायतीत त्यांच्या समर्थकाने सत्तेचा गैरवापर करून आणि प्रशासनातील अधिकार्यांना हाताशी धरून लाखों रूपयांचा भ्रष्ट्राचार केला असल्याची चर्चा मतदार संघात असुन त्यांच्या कार्यकर्त्यांने केलेल्या भ्रष्ट्राचाराची चौकशी करण्याच्या मागणी साठी आज (दि.११ जुन) पासुन गटविकास अधिकारी कार्यालया समोर सामाजीक कार्यकर्ते अशोक कोंडींबा साबळे आणि सुरेश भास्करराव कवडे यांनी आमरण उपोषण सुरू केल्यामुळे आ.लोणीकरांनी दिव्याखालचा अंधार पहावा अशी चर्चा मतदार संघातील नागरीक दबक्या आवाजात करत आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, परतुर तालुक्यातील मौजे वैजोडा येथील धनगर समाजाची स्मशानभुमी तसेच दलित समाजातील स्मशानभुमी या दोन्ही स्मशानभुमीचे मंजुर झशलेले कामे अद्यापही झाले नाही मात्र एमआरजीएस योजनेअंतगत बिले उचलली, मातोश्री पांदन रस्ता गुत्तेदार गिरी यांनी अधिकार्यांना हाताशी धरून थातुर-मातूर काम करून अंत्यत निकृष्ट दर्जाचा रस्ता करून बोगस बिले उचचली, तसेच वैजोडा येथील होळकर नगर (धन-गरवस्ती) या ठिकाणी मंजुर झालेला सिमेंट रस्ता अन्य इतर ठिकाणी बोगस काम करू या कामाचे देखील बिले उचचली आहेत, तसेच होळकर नगर (धनगर वस्ती) या भागात मंजुर असलेली पाणी पुरवाठा पाईपलाईनचे बोगस काम करून शासनाच्या मुल्यांकनाच्या आधारे विकासकामे न करता शासनाची दिशाभुल करून बिले उचलुन सरपंच, ग्रामसेवक, इंजिनिअर, गुत्तेदार निगरगट्ट झाले आहेत, त्यामुळे त्यांनी कामांची तात्काळ चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर शासनाची फसवणुक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करून सदरील कामे ही पुन्हा पारदर्शकपणे करण्याची मागणी श्री.साबळे आणि श्री.कवडे यांनी केली आहे. या उपोषणामुळे कामे व्यवस्थित होतील हिच अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त

### मंठा शहरात अल्पवयीन मुलीचा विवाह पोलिसांनी रोखला

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा पोलिसांना गुप्त माहिती दाराच्या आधारे तारीख १० मंगळवार रोजी संत तुकाराम नगर येथील शनी मंदिराच्या पाठीमागे बालविवाह होणार असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन बालविवाह रोखला. सदर घटनेचा पंचनामा करून मुलीच्या पालकांना समज देत बाल विकास संस्था यांच्या समक्ष हजर राहण्याच्या सूचना दिल्या. सदर कार्यवाही पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे , संतोष माळगे , आनंद ढवळे , वर्षा जुंबडे , कल्पना डोईफोडे , विजय तांगडे यांनी केली असल्याची माहिती सुत्रांकडुन प्राप्त झाली आहे.

**जळगाव सपकाळ येथील आदिवासी आश्रमशाळेतील**

### चार विद्यार्थी पोलीस दलात रुजू; तीन सख्ख्या भावांचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



भोकरदन तालुक्यातील जळगाव सपकाळ आदिवासी आश्रमशाळेतील चार विद्यार्थ्याचे दिनांक १० जून रोजी लातुर येथे झालेल्या दिक्षात समारोहत प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र पोलीस सेवत रुजू झाले असून यामध्ये तीन संख्या भावंडाचा समावेश आहे, राम योगीराज सोनुने कोल्हापूर श्याम योगीराज सोनुने छ.संभाजी ग्रामीण पोलीस तर तिसरा भावाचा हिरालाल योगिराज सोनुने सातारा पोलीस महाराष्ट्र पोलीस दलात रुजू झाले आहे, पवन अशोक दांडगे हा कोल्हापूर पोलिस येथे रोज झाला असून हे चारही विद्यार्थी महाराष्ट्रात पोलिस दलात दाखल झाले. या सर्व विद्यार्थ्यांचे मा.केद्रिय रेल्वे मंत्री श्री रावसाहेब दानवे ,आ.संतोष पा.दानवे,आ.सजना ताई जाधव प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे प्रशासकीय अधिकारी श्री संदिप साबळे,सौ धनश्री राठोड, मुख्याध्यापक ए. ए सोनवणे,ए.बी चोरमारे सुनिल लोखंडे, राजाराम दांडगे, गजानन वराडे, सुरेश जिधव, जनार्दन कराड , विष्णू सोनुने, सुनिल रोजेकर, संजय कोरडे विजय पंडित एम .बी चित्ते अधिक्षक प्रविण वाघमारे, अधिक्षका सौ अर्चना देशमुख,राजु भोपळे, ज्ञानेश्वर दानवे आर एम सोनुने गणेश मुंढे गजानन रावळकर, सुनिल कानडजे ज्ञानेश्वर तिडके, यांच्यासह योगेश कड यांनी अभिनंदनचा वर्षाव केला,

### जालना जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वाऱ्यासह पाऊस

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात१४ जुन २०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे. मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये.

## शाळेच्या पहिल्या दिवशीच मोफत पाठ्यपुस्तके व मोफत शालेय गणवेश मिळणार -गोविंद चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

येत्या शैक्षणिक सत्राच्या अर्थात शाळेच्या पहिल्याच दिवशी शालेय विद्यार्थ्यांच्या हातात नवीन कोरी पाठ्यपुस्तके मिळणार असून सध्या पाठ्यपुस्तकांचे वितरण तालुकास्तरावरून केंद्रस्तर व केंद्र स्तरावरून शाळास्तरांपर्यंत केले जात असल्याचे नूतन गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

याबबत सविस्तर वृत्त असे की, दरवर्षीप्रमाणे यावर्षीही समग्र शिक्षा अभियान (एस.एस.ए.) अंतर्गत इयत पहिली ते आठवीच्या मराठी, उर्दू व सेमी इंग्रजी माध्यमाच्या शासकीय शाळा, अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांतील सर्वच विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक योजनेचा लाभ मिळणार असल्याने पालकांनी खुल्या बाज-ारातून पाठ्यपुस्तकांची खरेदी करू नये असे आवाहन प्रसिद्धीपत्रकात करण्यात आले आहे. सद्यस्थितीत तालुका कार्यालयास जिल्हा कार्यालयाकडून चवऱ्याण्णव हजार पाठ्यपुस्तके प्राप्त झाली असून उर्वरित दहा टक्के पाठ्यपुस्तके लवकरच जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त होणार असल्याचे संकेत आहेत. तालुका कार्यालयाकडून केंद्रस्तरावर व केंद्रस्तरावरून शाळास्तरावर पाठ्यपुस्तकांचे युद्धपातळीवर वितरण सुरु असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. एकही विद्यार्थी मोफत पाठ्यपुस्तक योजना तसेच मोफत गणवेश योजनेच्या लाभापासून वंचित राहणार याची दक्षता घेण्याच्या सूचना प्रशासनाकडून संबंधित मुख्याध्यापकांना देण्यात आल्या असून योजनेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा कामाला लागली आहे. इयत्ता पहिली ते आठवीमध्ये शिकणाऱ्या सर्व जात प्रवर्गाच्या मुलां - मुलींना सदरहू दोन्ही योजनांचा लाभ मिळणार असून मोफत शालेय गणवेश हे खरेदी करण्याचे सर्वाधिकार शालेय व्यवस्थापन समित्यांना देण्यात आले असून शालेय व्यवस्थापन समित्यांना निधीचे वितरण तालुका स्तरावरून करण्यात येत असल्याचे कळविण्यात आले आहे. मोफत गणवेश योजनेसाठी प्रतिविद्यार्थी मुलां - मुलींसाठी तीनशे रुपये प्रती गणवेश या प्रमाणे दहा हजार पंच्याण्णव विद्यार्थ्यांसाठी मंठा तालुक्यासाठी तीस लक्ष अठ्ठावीस हजार पाचशे रुपयांची तर विद्यार्थ्यांना बूट - सॉक्स खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रुपये एकशे सत्तर प्रमाणे दहा हजार सहाशे सत्तर विद्यार्थ्यांसाठी अठरा लक्ष तेरा हजार नऊशे रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे प्रसिद्धीपत्रकांद्वारे जाहीर करण्यात आले आहे.

शालेय व्यवस्थापन समित्या आणि शाळा प्रमुख यांनी विद्यार्थ्यांसाठी गणवेश व बूट - सॉक्स खरेदी करताना शासन निर्णयानुसार गुणवत्ता व दर यांची पडताळणी करूनच तसेच महाराष्ट्र ट्रेझरी रूल व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई (एमपीएसपी) यांनी घालून दिलेल्या नियमावलीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. आर्थिक अनियामियतता आढळून आल्यास संबंधित शालेय व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापक यांच्या विरोधात योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार असल्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## जाफराबाद शहरात अवैध सटा मटका बाजार जोरात!

### सट्टा किंग ची दादागिरी; पोलीस अधीक्षक याकडे लक्ष देणार का?

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात बेकायदा मटका, व्यावसायिकांचे प्रमाण फोफावत असल्याने अवैध व्यवसायामुळे कायदा व सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न तालुक्यात निर्माण होत आहे. विशेषतः मटका माफिया जाफराबाद एक नसून चार ते पाच लोक स्वतंत्रपणे मटका, जुगार चालवत आहेत. त्यापैकी जालना रोड बस स्टॅन्डच्या बाजूला पंचायत समिती जवळ तहसीलच्या समोर असल्याचे लोकचर्चेतून समजत आहे. या सट्टा, मटका माफीयांकडे जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी माहोरा तसेच जाफराबाद शहरांमध्ये शहरामध्ये विविध यांचे एजंट द्वारे मटका संकलन केल्या जातो व कमी वेळात झटपट श्रीमंत होण्याच्या नादात

**विशेष करून तहसील कार्यालय कृषी अधिकारी कार्यालय पंचायत समितीच्या गेट समोरच आणि मेन रोडवर अवैध्य सट्टा मटका व्यवसाय सुरू असल्याचे जाफराबाद तालुक्यात विशेष चर्चा याकडे कोण लक्ष देणार.**

रुपयावर नव्वद रुपये मिळत असल्याने बेरोजगार तसेच लालची प्रवृत्तीचे लोक या मटक्याच्या मागे लागलेले असून आज पर्यंत हे मटका किंग लाखो करोडो ने श्रीमंत होत आहेत मात्र मटक्यावर पैसा लावणारे गरीब व बेरोजगार आणखीनच गरिबीच्या दरीत ओढल्या जात आहेत. सर्व मटका माफिया व्यवसाय सुरळीत चालावे व त्यांचा वचक असायला पाहिजे म्हणून स्थानिक यंत्रणेला अर्थपूर्ण' पद्धतीने सोबत घेऊन चालत असल्यानेच जाफराबाद



शहरात हा मटका व्यवसाय तेजीने व बेधडक होतं असल्याचे लोकांमध्ये खुलेआम चर्चिले जात आहे. तर जिल्हा प्रशासनाकडून यावर अंकुश लावणार का मोहात गुंतलेल्या सामान्य नागरिकांना सट्टा, मटका, जुगार यातून दिलासा मिळावा अशी सुज्ञ नागरिक अपेक्षा बाळगून आहेत.

सकाळी नऊ वाजल्यापासून ते रात्री बारा वाजेपर्यंत चालणारा मटका यामध्ये श्रीदेवी टाईम बाजार कल्याण मिलन डे मिलन नाईट मेन बाजार हे बाजार तालुक्यात चालतात.

## दिव्यांग कु.पुनम मापारी ठरली गोल्डन फीमेल व्हॉईस ऑफ जालनाची मानकरी



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे महिलांसाठी आयोजित 'गोल्डन फीमेल व्हॉईस ऑफ जालना - २०२५ ही कराओके गीत गायन स्पर्धा जेईएस महाविद्यालयाच्या सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत दिव्यांग कु. पुनम मापारी हिने आपल्या सशक्त सादरीकरणाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावून गोल्डन फीमेल व्हॉईस ऑफ जालना हा बहुमान मिळवला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्याहस्ते दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बदनापूरचे माजी आमदार संतोष सांबरे, उद्योगपती विनय कोठारी यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर लायन्स क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्डा, सचिव मंजू श्रीमाली आणि कोषाध्यक्ष कल्पना बियाणी उपस्थित होत्या. याप्रसंगी प्रमुख पाहुणे संतोष सांबरे व विनय कोठारी यांनी आपल्या सुमधुर आवाजात गाणी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या स्पर्धेत १५ वर्षांवरील एकूण २४ महिला स्पर्धकांनी सहभाग घेतला. हिंदी व मराठीमधील जुनी-नवीन सुरेल गाणी सादर करण्यात आली. स्पर्धेचे परीक्षण प्रसिद्ध गायक सुनील शर्मा, श्री. गजेंद्र पळसकर आणि अश्विनी कायंदे यांनी केले. या स्पर्धेत कु. पुनम मापारी हिने प्रथम, प्रीती काटोले यांनी द्वितीय, अमृता चाकोते यांनी तृतीय तर पूजा वेताळ आणि रोशनी पारवे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख बक्षिसे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्पप्रमुख कमलबाबू झुनझुनवाला, प्रकाश कुंडलकर, राजेश लुनिया, मीरा खरात, वृंदा कुंडलकर, जयप्रकाश श्रीमाली, अतुल लड्डा, बद्रीनारायण बियाणी, कृष्णा लड्डा , प्राची बंग, गजानन मापारी, विजय शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन मापारी यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रकाश कुंडलकर यांनी केले.

## सरकारने रंग बदलण्यात सरड्यालाही मागे टाकलं!

### बदनापूरमध्ये माजी.आ.संतोष सांबरे यांचा सरकारवर घणाघात

**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर/प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. क्या हुआ तेरा वादा? अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून निघाला. या आंदोलनात माजी आमदार संतोष सांबरे यांनी राज्यातील महायुती सरकारवर रोखठोक शब्दांत घणाघात केला.

ट्रॅक्टर मोर्चा बसस्थानक ते तहसील कार्यालय बदनापूर दरम्यान काढण्यात आला. या वेळी तालुक्यातील शेतकरी, शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपली नाराजी व्यक्त केली. तहसीलदारांना शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.



मोर्चाच्या समारोपप्रसंगी बोलताना माजी आमदार संतोष सांबरे म्हणाले, महायुती सरकारने रंग बदलण्यात सरड्यालाही मागे टाकलं आहे. निवडणुकीपूर्वी गाजवलेली 'सातबारा करूया कोरा' ही घोषणा आता पोकळ ठरली आहे. कर्जमाफी, प्रोत्साहनपर अनुदान, कापूस-सोयाबीनला भाव - सगळंच फसवं ठरलं आहे. शेतकऱ्यांचे जीव गेले, पण सरकारला काही फरक पडत नाही.सांबरे पुढे म्हणाले, सरकारकडून कर्जमाफीच्या नावाखाली थट्टा सुरू आहे. आर्थिक वर्ष संपत आले तरी अजित पवार म्हणतात, 'कर्ज भरा'. हजारो शेतकरी आत्महत्या करत असतानाही सरकारला आकड्यांचा खेळ करण्यात रस आहे, त्यांना शेतकऱ्यांचा खरा प्रश्न समजतच नाही.भानुदास घुगे यांनीही सरकारवर टीका करताना सांगितले, फडणवीस सरकार फक्त उद्यो-जकांचा सरकार आहे. शेतकऱ्यांचा फक्त उपयोग करून घेण्याची नीती त्यांची आहे. हमीभाव दीडपट करणार म्हणाले, पण शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळलं. भगवान कदम यांनी कृषी विमा योजनेवर भाष्य करत सांगितले, शेतकऱ्यांचा १ रुपयात विमा बंद केला आणि विमा कंपन्यांच्या खिशात दीड लाख कोटी रुपये गेले. पंचनामेही नाहीत, नुकसान भरपाई तर दूरची गोष्ट.जयप्रकाश चव्हाण, तालुकाप्रमुख, म्हणाले, सरकारच्या स्वप्नांची अंमलबजावणी शून्य आहे. लोडशेडिंग, महिला योजनांमधील कट - सर्वत्र जनतेची फसवणूक सुरू आहे. आठ लाख महिलांचा लाभ थांबवून सरकारने विश्वासघात केला आहे.या आंदोलनात माजी आमदार संतोष सांबरे, जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हा प्रमुख भगवान कदम, तालुकाप्रमुख जयप्रकाश चव्हाण, संजय जाधव, रामेश्वर फंड, परमेश्वर म्हात्रे, दत्तू ननवरे, केशव क्षीरसागर यांच्यासह तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

बातमीचा निष्कर्ष:
बदनापूरमध्ये झालेला हा ट्रॅक्टर मोर्चा म्हणजे फक्त शेतकऱ्यांची एकजूट नव्हे, तर सरकारच्या दिशाहीन धोरणांवर दिलेला इशारा होता. आश्वासनांची पुर्तता न करणाऱ्या सरकारविरोधात लोकमत अधिकच जागृत होत असल्याचे या आंदोलनातून स्पष्ट दिसून आले.